www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी




मुख्य संपादक - भारती संतोष आमले उपसंपादक - श्री विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे निवासी संपादक- श्री राकेश जनार्दन पाटील सह संपादक - मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 349 बुधवार दि. 03 सप्टेंबर २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : 6 RNI MAHMAR/2023/89514

# मराठा आरक्षण



## सरकारनं जीआर काढला, मनोज जरांगेंनी उपोषण सोडलं



मराठा समाजाला ओबीसी कोट्यातून आरक्षण मिळावे, या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील मुंबईतील आझाद मैदानात उपोषणाला बसले होते. या आंदोलनासाठी राज्यातील शेकडो मराठा बांधव मुंबईत आले होते. अखेर आज, जरांगे यांच्या मराठा आरक्षणासंदर्भातील मागण्यांवर सरकारने जीआर काढला आणि जरांगे यांनी पाच दिवसांपासून सुरू असलेले आपले उपोषण सोडले. यानंतर आता, यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सविस्तर माहिती दिली आहे.

**काय म्हणाले मुख्यमंत्री? –**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, “सर्वप्रथम मला राधाकृष्ण विखे पाटील जे या मंत्रीमंडळ उपसमितीचे अध्यक्ष होते आणि मंत्रीमंडळ उपसमितीतील सर्व प्रमुख नेत्यांचे तसेच आमच्या मंत्र्यांचे अतिशय मनापासून अभिनंदन करायचे आहे. त्यांनी सातत्याने बसून एकेका गोष्टीचा अभ्यास करून मोठ्या प्रमाणावर चर्चा करून, हा मार्ग काढला. आता हा मार्ग निघाल्याने, जे मराठवाड्यात राहणारे आमचे मराठा समाजाचे लोक आहेत, कधी काळी त्यांच्या रक्त नात्यातील कुणाचाही कुणबी म्हणून उल्लेख झाला असेल, तर त्यांना आपल्या नियमाने ते प्रमाणपत्र (कुणबी प्रमाणपत्र) देता येते. तसेच, हैदराबाद गॅझिटियरमुळे अशा प्रकारच्या नोंदी शोधणे सोपे होणार आहे. त्यातून फॅमिली ट्री तयार करून, अशा प्रकारचे आरक्षण देता येणार आहे. म्हणजेच, ज्यांना अशा प्रकाराचा पुरावा मिळेल, त्या सर्वांना हे आरक्षण मिळेल.”

**...अशा मराठा समाजाच्या लोकांनाच मिळणार फायदा –**

याच बरोबर, “औबीसी समाजात जी भीती होती की, सरसकट सर्वच अशा प्रकारचे आरक्षण घेतील आणि ज्यांच्याकडे पुरावा नाही, तेही आरक्षण घेतील आणि इतरही समाजाचे त्यात शिरण्याचा प्रयत्न करतील. तर तशा प्रकारे आता याठिकाणी होणार नाही. ज्यांचा खरा क्लेम आहे. पण कागदपत्रांच्या आभावी, त्यांना तो क्लेम मिळत नव्हता. अशा मराठा समाजाच्या लोकांना याचा फायदा मिळणार आहे. यामुळे मला असे वाटते की, मराठा समाजासाठी अतिशय चांगला निर्णय आणि विशेषतः हा संपूर्ण प्रश्न सर्वाधिक मराठवाड्यात होता. कारण मराठवाड्यात नोंदी नाहीत. म्हणून मराठवाड्यासाठी हा प्रश्न अत्यंत महत्वाचा होता आणि मराठवाड्यातून इतरही भागात राहण्यासाठी गेलेल्या लोकांसाठीही हा प्रश्न महत्वाचा होता,” असे फडणवीस म्हणाले.

मला असे वाटते की, त्यावर आम्ही संवैधानिक तोडगा काढू शकलो आहोत. एक असा तोडगा काढू शकलो आहोत की जो, न्यायालयातही टिकेल आणि त्यातून लोकाना फायदा होईल. म्हणून मी स्वतः देखील मंत्रिमंडळ उपसमितीच्या कामावर समाधानी आहे. त्यांनी उत्तम काम केले आहे. मी त्यांचे अभिनंदन करतो. या दरम्यान मुंबईकरांनाही थोडा त्रास सहन करावा लागला. त्यासाठी मी दिलगिरी व्यक्त करतो. पण मला वाटते की आपण एक चांगला निर्णय या ठिकाणी घेतला आहे,” असेही फडणवीस म्हणाले.




### राज्यात कुणाला किती आरक्षण ?

| समाज | आरक्षणाची टक्केवारी |
|---|---|
| ओबीसी | 19 % |
| एससी | 13 % |
| व्हीजे/एनटी | 11 % |
| एसटी | 07 % |
| एसबीसी | 02 % |



# विद्यार्थ्यांसाठी शिक्षकांनी सर्वतोपरी योगदान द्यावे --महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे सचिव श्री दत्तात्रय(भाऊ) जोंधळे यांचे प्रतिपादन

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**
**निफाड पालखेड** - महाराष्ट्र शिक्षण संस्था संचलित न्यू इंग्लिश स्कूल,पालखेड येथे आज दि २ रोजी महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे सचिव/कार्याध्यक्ष श्री दत्ताभाऊ जोंधळे यांनी सदिच्छा भेट दिली,
याप्रसंगी श्री दत्ताभाऊ जोंधळे यांनी पालखेड विद्यालयाच्या प्रगतीचा उंचावणारा आलेख पाहून समाधान व्यक्त केले,तसेच मार्केटिंगच्या जमान्यात असणाऱ्या गोष्टींचाही विचार करावा,विद्यार्थ्यांचा एकही मिनिटं शिक्षकाने वाया घालवू नये,प्रत्येकाने आत्मपरीक्षण करून स्वतःला विचारावे की आपण आज विद्यार्थ्यांना काय दिले? याबाबतीतही जागृत रहावे,तसेच विद्यालयाच्या इमारतीचे रंगकाम,नूतन ऑफिस स्थलांतराची पाहणी केली. शिक्षण व शाळेविषयी सकारात्मक भावना निर्माण करावी,सद्गुण वाढवून शिक्षण



पालखेड विद्यालयात सदिच्छा भेटीप्रसंगी श्री दत्तात्रय भाऊ जोंधळे समवेत उपाध्यक्ष श्री निवृत्ती नाना थेटे,मुख्याध्यापक श्री अशोक शेळके सर,श्री पुंजाहरी दिघे सर आदी

क्षेत्रात आमूलाग्र योगदान द्यावे,ध्येय निश्चित करून यश साध्य करावे,शाळेचे नवीन प्रवेश,राबविण्यात येणारे विविध उपक्रम,भौतिक सुविधा,अध्यापनातील प्रामाणिकता यांबाबत विस्तृत आढावा घेऊन शिक्षकांनी आपली आचारसंहिता जपून विद्यार्थ्यांसाठी शिक्षकांनी सर्वतोपरी योगदान द्यावे असे प्रतिपादन श्री दत्तात्रय भाऊ जोंधळे यांनी केले,
यानंतर महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष श्री निवृत्ती नाना थेटे यांनी विद्यार्थ्यांची गुणवत्ता,शालेय शिस्त,कामकाजाचे वेळेत नियोजन याबाबत मनोगतातून सूचित केले,
याप्रसंगी मुख्याध्यापक श्री अशोक शेळके सर यांनी विद्यालयाच्या बाबतीत असणाऱ्या सर्व बाबींचा उलगडा आपल्या प्रास्ताविकात केला,
यावेळी विद्यालयाच्या वतीने महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष श्री निवृत्ती नाना थेटे,कार्याध्यक्ष/सचिव श्री दत्ताभाऊ जोंधळे,श्री पुंजाहरी दिघे सर आदींचा शाल, पुष्पगुच्छ देवून यथोचित सन्मान करण्यात आला,
यावेळी मुख्याध्यापक अशोक शेळके, निलेश गवांदे, दीपक देशमुख, हेमंतकुमार होलगडे, सुनंदा दुर्धवळे ,संजय लव्हांगडे, मंगेश कागदे, शैलेश शिखरे, किरण थेटे, सागर जाधव,राजेंद्र नाठे, संदीप आहेर, दत्तात्रय पगार, सावन जाधव, संजय कोकतरे, कविता ढोमसे,सारिका पवळे,राहुल दवते, सुरेश गांगुर्डे, रामदास पवार, नदीम तांबोळी आदी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री सावन जाधव सर यांनी तर आभार श्री दत्तात्रय पगार सर यांनी मानले,

# दैनिक युवक आधारच्या बातमीने मोरेगावचे आरोग्य उपकेंद्र सुरू

## डॉक्टर व एक कर्मचारी उपस्थित

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- तुकाराम नाटकर**
मोरेगाव (सेलू) तालुक्यातील मोरेगाव येथे शासनाने सर्व सुविधायुक्त 70-75 लाख खर्च करून प्राथमिक आरोग्य उपकेंद्र उभारले आहे. ज्याचा फायदा मोरेगाव सह परिसरातील गावांना होतो तेथे गोरगरीब नागरिक उपचार घेऊ शकतात. परंतु दुर्दैवाची बाब म्हणजे ते सतत बंद असते आणि तेथे कर्मचारी नियमित येत नाहीत.यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या संदर्भात गावच्या तरुणांनी पुढाकार घेत आरोग्य अधिकारी यांना आरोग्य उपकेंद्र बंद असल्याबाबत निवेदन दिले होते.मोरेगाव येथील आरोग्य उपकेंद्र हे नियमित चालू ठेवावे व नियुक्त कर्मचारी पूर्णवेळ उपलब्ध असावे. अशी मागणी तरुणांनी निवेदनाद्वारे केली होती.




अशा प्रकारची बातमी दैनिक युवक आधार या वृतमानपत्रात प्रकाशित करताच आरोग्य खाते जागे झाले. परिणामी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बातमीची दखल घेऊन आरोग्य उपकेंद्र चालु केले आहे. या बातमीची दखल दैनिक युवक आधार ने घेत गावकऱ्यांना न्याय मिळवून दिला आहे.त्यामुळे ग्रामस्था कडून दैनिक युवक आधार प्रतिनिधी तुकाराम नाटकर यांचे कौतुक करण्यात येत आहे.

# आदिवासी मुलींच्या वसतिगृह बांधकामासाठी उमरखेड शहरात मध्यभागी जागा द्या

## आदिवासी युवा परिषद तालुकाध्यक्ष राजू गायकवाड यांची मागणी

**दैनिक युवक आधार**
**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजू गायकवाड**
आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह उमरखेड च्या इमारत बांधकामाकरीता तालूका कृषी अधिकारी उमरखेड या कार्यालयासमोरील खुली जागा मिळण्याबाबत उपविभागीय अधिकारी उमरखेड यांना निवेदन देण्यात आले उमरखेड शहरात आदिवासी विकास विभागाकडून आदिवासी मुला/मुलींकरीता शासकीय वसतिगृह कार्यरत आहे. सदर वसतिगृह सद्या भाडयाच्या इमारतीत कार्यतर आहे. सदर वसतिगृहाकरीता सर्वे नं २६/१ मध्ये स्मशान भूमिच्या बाजूला शासकिय जमिन उपलब्ध असल्याचे माहित यांना माहित झाले होते पण सदर जमिन आदिवासी मुलीच्या शासकीय वसतिगृहाच्या दृष्टीने सोइस्कर नाही. कारन सदर जमिन शहरा बाहेर असून शाळा महाविद्यालयात विद्यार्थीनिंना ये-जा करण्याच्या दृष्टीने




तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने सोईस्कर नाही. तालुका कृषी अधिकारी कार्यालय उमरखेड यांच्या कार्यालया समोरील खुली जागा जी सर्वे नं २६/१ मध्ये आहे. सदर जागा मुलींच्या सुरक्षेच्या दृष्टीने तसेच शाळा महाविद्यालयात ये-जा करण्याच्या दष्टीने सोईची आहे त्यामुळे उपविगीय अधिकारी उमरखेड यांना निवेदनातून विनंती केली आहे कि सदर जागा आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृहा साठी उपलब्ध करून द्यावी
अशी विनंती केली आहे यावेळी अखिल भारतीय आदिवासी युवा परीषद शाखा उमरखेड चे तालुकाध्यक्ष राजू गायकवाड,रामेश्वर खंदारे, सखाराम खोकले, सुदाम दांडेगावकर,ऋषिकेश डाखोरे,नितीन पोटे,किसन मोरे,दत्ता कांबळे, सतीश रणमले,अजय श्रावणे,धम्मदीप भालेराव सह कार्यकर्ते उपस्थित होते.

# 'महाराष्ट्र रत्न' हा माझा सन्मान नसून सर्व मतदार संघातील जनतेचा सन्मान आहे माजी मंत्री आ.संजय बनसोडे

**दैनिक युवक आधार**
**उदगीर प्रतिनिधी बालाजी तेलंगेः**
- शहरातील विविध गणेश मंडळातील गणेश भक्तांच्या आग्रहाखातर माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांनी श्री गणेशाची मनोभावे आरती केली व मतदारसंघातील जनतेच्या सुख समाधानासाठी श्री गणरायाकडे साकडे घातले.
यावेळी माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांचा विविध गणेश मंडळाच्या वतीने लंडन येथे 'महाराष्ट्र रत्न' पुरस्कार मिळाल्याबद्दल भव्य सत्कार करण्यात आला.
या सत्काराला उत्तर देताना आमदार संजय बनसोडे म्हणाले की,
मागील पाच वर्षाच्या कार्यकाळात मतदार संघाचा सर्वांगीण विकास केला. ही शक्ती केवळ आपल्या मतामुळे मिळाली. गेल्या १० वर्षात मी मतदार संघातील जनतेच्या सुख सोईसाठी रात्रंदिवस काम केले आहे. त्याची दखल घेवुन मला लंडन येथे 'महाराष्ट्र रत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा माझा सन्मान नसून सर्व मतदार संघातील जनतेचा सन्मान असल्याचे मत माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.
ते उदगीर येथील विविध गणेश मंडळाच्या भेटी दरम्यान मंडळाकडून केलेल्या सत्कार सोहळ्याप्रसंगी बोलत होते.
पुढे बोलताना आ.संजय बनसोडे यांनी,



मतदारसंघातील जनतेने दिलेल्या पाठबळामुळेच हा प्रतिष्ठेचा पुरस्कार मला मिळाला असून आपल्या सत्कारामुळे मला पुन्हा काम करण्यासाठी ऊर्जा मिळाली आहे. सदर पुरस्कार हा मी माझ्या जनतेला समर्पित करतो अशी भावनाही आ.बनसोडे यांनी व्यक्त केली आहे.
यावेळी माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, प्रा. शाम डावळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष बालाजी भोसले पाटील, तालुका कार्याध्यक्ष वसंत पाटील, शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, शहर कार्याध्यक्ष शशिकांत बनसोडे, भाजपाचे माजी शहराध्यक्ष मनोज पुदाले, भाजपा शहराध्यक्ष अमोल अनकल्ले,माजी नगरसेवक विजय निटुरे, अनिल मुदाळे, अनिरुद्ध गुरुडे, गिरीश उप्परबावडे, ज्ञानेश्वर बिरादार येणकीकर, ज्ञानेश्वर पाटील रावणगावकर, प्रा.मल्लेश झुंगास्वामी, राजकुमार हुडगे, बबलू मुळे आदीसह मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# "दृष्टिक्षेप"

**"ईपीएस 95 पेंशन धारकांना दिलासा मिळेल काय?"**
वर्तमान परिस्थतीत ई.पी.एस.95 पेंशनधारकांची स्थिती फारच बिकट होत असल्याचे जाणवते आहे. संबंधित पेंशन धारकांना न्याय मिळालाच पाहीजे याकरीता वारंवार ज्वलंत विषयावर संबंधिता/समिती कडून मोर्चे, आदोंलने, साखळी उपोषणे, घेराव, चर्चा शिवाय संसदेवर मोर्चा देखील काढलेला आहे, वर्तमानात नुकतेच 4-5 ऑगस्ट 2025 ला जंतर मंतर मैदान, दिलली येथे आंदोलन आटोपले, त्याच मंडपामध्ये सर्व पक्षाचे एकूण 52 खासदार यांनी भेटी दिल्या. तसेच 6 ऑगस्ट 2025 ला संसदेच्या पायरीवर 27 खासदारांनी काही तासासाठी आंदोलन केले, तसेच 12-13 खासदारांनी स्वतः भेटुन मा. श्रीमती निर्मला सितारमण, अर्थमंत्री, भारत सरकार यांना निवेदन दिले. जेणेकरून पेन्षन धारकाची व्यथा ला लवकरच दिलासा मिळावा. पण आता पावेतो यावर सरकारचे कोणतेही उत्तर अपेक्षित होते पण नाईलाजाने म्हणावेसे वाटते की, जेश्ठ नागरिकांना पेन्षन न मिळणे म्हणजे त्यांचा समाप्तीकडे जात असतांना हा अपमान नव्हे काय? असे ईपीएस पेन्षन धारकांना वाटते. या कडे सरकारनी लवकरच लक्ष दयावे हि पेन्षन धारकाकडून विनंती करीत आहो.
किंबहुना याचा सरकारवर काहीच परिणाम झालेला दिसून येत नाही वरील विषयावर सखोल चर्चा अशी समोर आली आहे की या विषयावर कुण्या लोकप्रतिनिधीला चिंता नाही वाटत काय? असे म्हणावेसे वाटते की, बहुतेक लोक प्रतिनिधी झोपेचे सोंग घेत आहे असे जाणवते. काही दिवसापूर्वी वृत्त पत्राच्या माध्यमातून असे कळते की, "कोशियारी समितीच्या शिफारसीनुसार पेंशन मिळणार तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार वाढीव पेंशन मिळणार" परंतु आता पावेतो पेंशन मिळाली नाही याचेच अतिदुःख पेंशन धारकाला वाटत आहे. अश्या गोष्टीचा कोणी तरी दखल घेईल काय?
हा विषय सरकारच्या खात्यात कुठे व कशामुळे अडला आहे हा प्रश्न सतत भोळयाभाबळया पेंशन धारकाला सतत विनाकारण सतावत असतो यालाच 'अच्छे दिन' म्हणावे काय? जगाच्या पाठीवर जगतांनी फक्त रूपये 1,000/- ते 2,500/- पेंशनच्या रूपाने दोन वेळचे जेवन तरी होईल काय? मग औषधोपचार तर कोसो दूर राहीला. वर्तमान काळात अश्या तुटपुंज्या पेंशनमुळे आम्हावर "भिक" मागण्याची पाळी का बर यावी. शेतकरी अशिक्षित असतो म्हणून आत्महत्येच्या दारात शिरतो, तर आम्ही सर्व पेंशन धारक शिक्षीत आहो म्हणून थोडा विचार करतो म्हणून की काय आम्हाला आत्महत्येसाठी परावृत्त कराल काय? यालाच जगणे म्हणावे काय? एकिकडे आमदार खसदारांना लाखो रूपये पेन्षन मिळते तर आम्ही 35 ते 40 वर्श देषाच्या बळकटीसाठी, उत्थानासाठी, प्रगतीसाठी अहोरात्र झटत असल्याचा काय फायदा असे नाईलाजाने म्हणावे काय? तसेच ज्यांच्या भरोसावर आमदार, खासदार निवडुन येतात त्यांना तुटपुंजी पेन्षन का? याचा विचार होणे व चर्चा होणे महत्वाची नाही काय? आपण आपल्या भारत देशात 93 लक्ष पेंशन धारक आहे आणि भविष्यकाळात काही कर्मचारी निवृत्त होतील या निवृत्तीधारकांचा करोडो रूपाने पैसा सरकारजवळ/ईपीएफओ कार्यालयाजवळ असतांना शिवाय त्यावरील व्याज मिळत असतांना वाढीव पेंशन नाकारणे कितपत बरोबर आहे? असे आम्हाला नाइलाजाने म्हणावे लागेल? काही वर्षा अगोदर रू. 3000/- व त्यावरील माहागाई भत्ता सांसदिय समितीने वाढीव पेंशन शिफारस केली असता ती सुध्दा आता पावेतो देण्यात आलेली नाही, मग लोकप्रतिनिधीला भरमसाठ पेंशन का दिली जाते, लोक प्रतिनिधी फक्त 5 वर्ष जनतेची सेवा करतात त्यांना 80 हजार त्याहुनही जास्त पेंशन दिली जाते पण जो कर्मचारी देशाची सेवा 35 ते 40 वर्षापर्यंत करतो त्याला वाढीव पेंशन का नाकारली जाते?



हे कोड न समजण्यासारखे आहे हि सामान्याची अवहेलना/अपमान नाही काय? आपण महागाईचा सर्वोपरी विचार केला असता अगोदरपेक्षा कितीतरी पटीने वाढलेली दिसुन येते त्यानुसार वाढीव पेंशन मिळाली पाहीजे असे कुण्या लोकप्रतिनिधीला वाटत नाही काय? यालाच "सबका साथ, सबका विष्वास, सबका विकास म्हणता येईल काय?"
वरील विषयावर "कोशीयारी समिती" तसेच सर्वोच्च न्यायालयाचा निकाल असुन सुध्दा वाढीव पेन्षन कां? व कष्यामुळे नाकारली जाते हेच सामान्य पेंषन धांरकाना कळेनासे झालेले आहे आपल्या देंषाची राजगादीची खया अर्थाने सेवा करायची असेल तर सर्वोच्च न्यायालयाचा अवमान करून चालणार नाही, हे मात्र खरे नाही काय? न्यायालयाचा माध्यमांनी जगभरातील प्रष्ने अनुत्तरीत न राहता बहुतेक विषयांवर चांगला तोडगा निघाल्याची अनेक उदाहरणे लोंकासमोर आहे त्यामुळे या जटील प्रष्नावर लवकरच उपाय काढण्याची यव्दारे विंनती करण्यात येत आहे, अन्यथा सामान्य/पेंन्षन धारकाना नुसता त्रास देऊन सरकारला काय हाती लागणार आहे? सरकार मध्ये बदल होईलही, पण भविष्य काळात येणारी सरकार आयत्या विषायांवर नुसत्या रेषा ओढल्या तर सामान्याची परिस्थितीत बदल घडून येणार काय? यावर एकच उपाय म्हणून लवकर वरील विषयावर सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाच्या आधारे योग्य विचार व्हावा व पेंशन धारकांना दिलासा दयावा असे म्हणणे लोकहितार्थ होईल? वर्तमानात मोबाईल वर सध्या खोटया बातम्याचा पाऊस पडत आहे. तसेच वरिश्ठ पत्रकार सुध्उदा खोटया बातम्या देण्यासाठी तरबेज आहे. कारण आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळात प्रिन्ट मिडीया तसेच इतर माध्यमातुन व्हॉट्सअॅप च्या रूपाने सरकारला भरपूर महसुल रूपाने पैसा मिळतो. म्हणून की काय खोटया बातम्या नेहमी व्हॉट्सअॅप रूपाने सामान्य लोकांना कळत हे पेन्षनधारकाचे दुःख कोणी जाणावे ?
ईपीएफ 95 अंतर्गत मिल मजदूर, मिडीया, वृत्तपत्रे, स्वराज्य संस्था, राज्य व केंद्रीय महामंडळे व इतर कार्यालये मोडतात याचा वाढीव पेंशनसाठी विचार केला जात नाही, मग सरकारी कर्मचायांना भरीव वेतन आयोगाचा रूपाने वेतन वाढ व महागाई भत्ता का दिली जाते? यावर प्रति प्रश्न निर्माण होतो की ते कर्मचारी जगतात, पण पेंशन धारक जगत नाही काय? वर्तमान काळात सरकार जे जे प्रकल्प राबवित आहे त्या सगळयांना किंमती वाढीव दिल्या जाते मात्र निवृत्ती धारकांचा विचार वाढीव पेंशन करीता का नाही? एखादी प्रकल्प काही अपरिहार्य कारणास्तव किंवा सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे बदल झाल्यास वाढीव किंमत दिल्या जाते, मग हा सामान्य पेंशनधारक उपेक्षित का? असे नाइलाजाने विचारावेसे वाटते. महत्वाचे असे की, एकीकडे भांडवलषाही धारकांना लाखो करोडो चे लोन भारत सरकारतर्फे माफ केले जाते मग पेन्षनधारकाला का बरं उपाषी ठेवल्या जाते. हे कोडे न समजण्यासारखे आहे. आतापर्यत भारत सरकारने ईपीएस पेन्षन धारकाला वाढीव पेन्षन न देणे म्हणजे पेन्षनधारकाची अवहेलना, अपमान नव्हे काय? याचे भोग सरकारला भविश्यकाळात भोगावे लागेल. एकीकडे आपण महासत्तेच्या गोश्टी करतो, दुसरीकडे मात्र पेन्षन धारकाचे वेळीच दखल घेत नाही याला आपण काय म्हणावे. या ज्वलंत प्रष्नाने देषाची लोकषाही दिवसेंदिवस पंगु होत असल्याचे जाणवते. तसेच भारतीय संविधानाचा सरकारकडून अवमान होत असल्याचे जाणवते.
जाता जाता ......... असा प्रश्न पडतो की, सर्वोच्च न्यायालयाचा अवमान न करता वरील विषयावर लवकरच तोडगा काढण्याची तसदी घ्यावी, जेणेकरून सामान्य पेंशन धारकाला वाढीव पेंशनचा योग्य दिलासा मिळेल व कोर्टाचा अवमान होणार नाही याबद्दल आम्हाला खात्री आहे शिवाय 93.00 लक्ष सामान्य पेंशन धारकाचा वाढीव पेंशन करीता संसदेत विचार व्हावा आणि या प्रश्नावर योग्य चर्चा व्हावी अशी अपेक्षा हि या लेखाव्दारे करीत आहो अन्यथा आम्हाला, सामान्य पेंशन धारकाला आगामी निवडणूकीमध्ये कर्तव्यजबावणीचे निर्णय स्वतःला घ्यावे लागते यात मुळच षंका नाही. महत्वाचे असे की, भारत सरकारने वेळोवेळी विष्वास दिला आहे त्या विष्वासाला तळा जावु नये असे कार्य सरकारने भविश्यात करू नये अषी विनंती या लेखाव्दारे सामान्य पेन्षन धारक या नात्याने करीत आहो.
वरील विषयावर सकारात्मतेच्या दृष्टिकोणातुन संसदेत/ सरकारकडे विचार व्हावा अशी अपेक्षा बाळगतो
शब्दांकनः विजय सरस्वती सिताराम सोनारघरे,
लेखक/वृत्तपत्र समिक्षक
"स्नेहविजय" 24, उदयनगर, गल्ली नं. 4, नागपूर-440024
प्रबंधक (सामान्य/परिचालन) भा.खा.नि. जिल्हा कार्यालय, अजनी, नागपूर-15.
(सेवानिवृत्त ऑगस्ट 2016) मो.नं. 9325733836

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## पाच दिवसाच्या गणपती विसर्जना वेळी खांदा कॉलनी मध्ये पनवेल महानगरपालिकेतर्फे सुसज्ज व्यवस्था

**दैनिक युवक आधार**
**खांदा कॉलनी प्रतिनिधी**

खांदा कॉलनी मध्ये पाच दिवसाच्या गणपतीचे विसर्जन शंकर मंदिर तलाव परिसरात मोठ्या उत्साहात पार पडली गणपती विसर्जन वेळी नागरिकांना पाण्यात उतरण्यास बंदी होती गणपती विसर्जनासाठी मोठ्या प्रमाणात स्वयंसेवक ची नियुक्ती केली होती तसेच छोट्या बोटी देखील होत्या पनवेल महानगरपालिकेने विसर्जना वेळी सुसजशी व्यवस्था केली होती तसेच पोलीस बंदोबस्त मोठ्या प्रमाणात होता खांदा कॉलनी मध्ये पाच दिवसाच्या गणपतीचे विसर्जन भाविकांनी मोठ्या श्रद्धेने केले यावेळी माजी उपमहापौर सिताताई पाटील तसेच पनवेल महापालिकेचे कर्मचारी मोठ्या संख्येने परिस्थिती होते




## इनरव्हील पनवेल तर्फे तळोजा कारागृहातील वाचनालयाला पुस्तकांची भेट

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

इनरव्हील क्लब पनवेलच्या सदस्यांनी तळोजा मध्यवर्ती कारागृहाला तेथील वाचलायनासाठी पुस्तके भेट दिली तसेच पोलीस व कैदी बांधवांना राखी बांधली. बंधुत्व आणि प्रेमाचा संदेश देत या उपक्रमातून कैद्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. यावेळी कैद्यांना प्रबोधनात्मक माहिती देण्यात आली व त्यांच्या वाचनालयासाठी पुस्तके दान करण्यात आली. तळोजा कारागृहातील सर्व पदाधिकाऱ्यांनी हा कार्यक्रम उत्तम रीतीने पार पडावा यासाठी सहकार्य केले.



# महिला औषधं निर्माण अधिकारी यांनी गौरी पूजनासाठी केला डेंगू जागरण देखावा सादर

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्यातील सणसर येथील सौ मीनाक्षी पुष्पराज निंबाळकर यांनी आपल्या घरी सार्वजनिक आरोग्य सुरक्षित रहावे अशा उद्देशाने संदेश देणारा गौरी गणपती पुढे डेंगू जागरण पर देखावा सादर केला आहे.सौ मीनाक्षी निंबाळकर या सिल्वर जुबली रुग्णालय बारामती येथे औषध निर्माण अधिकारी या पदावर कार्यरत असून त्या नेहमीच आपल्या कार्यातून सामाजिक संदेश देत असतात यापूर्वी देखील त्यांनी जीवनातील पहिलाच पगार जो कोविड मध्ये आवश्यक अशा कर्मचाऱ्यांना मास्क स्वरूपात वाटून एक आगळावेगळा संदेश दिला होता.. त्यावेळी या उपक्रमाचे राज्यभरातून कौतुक केले गेले तसेच त्या स्वतः डायबिटीक असून त्यावेळी कोविडमध्ये मागे न हटता कार्य करत राहिल्या घरामध्ये सासू-सासरे हे डायबिटीस आणि ब्लड प्रेशर रुग्ण असून तसेच त्यांना स्वतःला लहान मुलगी असून देखील त्यावेळेस कोरोना विरुद्धच्या लढाईत आपली सेवा देत राहिल्या त्यावेळीचे आरोग्य मंत्री मा.श्री नामदार राजेशजी टोपे साहेब यांच्या हस्ते राज्यातील पहिला कोविड योद्धा हा पुरस्कार पुणे येथे त्यांना



मिळाला.कामाला लागलेल्या पहिल्या दिवसा पासून कामाबरोबरच आपण समाजासाठी काही करू शकतो का? हे सतत त्यांच्या विचारामध्ये असते याच संकल्पनेतून सध्या पावसाचे दिवस असल्याने डेंगूचे आणि डेंगूसदृश्य,ताप सुदृश्य आजाराचे रुग्ण वाढत असतात ते करिता उपचारापेक्षा प्रतिबंध बरा.. या उद्देशाने हा देखावा त्यांनी गौरी गणपती पुढे सादर केला यातून त्यांनी दैनंदिन जीवनामध्ये घ्यावयाची काळजी आणि त्यातून कसा डेंगू सारखा आणि ताप सदृश्य सारख्या आजारांना प्रतिबंध होऊ शकतो याची माहिती सादर केली आहे. या कामांमध्ये घरातून देखील त्यांना साथ मिळते त्यांचे पती श्री.पुष्पराज निंबाळकर हे बारामती तालुका आरोग्य विभागामध्ये आरोग्य निरीक्षक म्हणून कार्यरत आहेत हे त्यांना नेहमीच पाठबळ देत असतात यातूनच त्यांना अशा नवनवीन संकल्पना सुचतात आणि याचा पुढे समाजास कसा फायदा होईल असा या दोघांचा विचार असतो असे सामाजिक उपक्रम समाजा समोर सादर करून दरवर्षी वेगळा उपक्रम करत असतात.

## इनरव्हील क्लबच्या वतीने रक्तदान शिबीर; ७७ रक्तदात्यांचे रक्तदान

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

इनरव्हील क्लब पनवेल डिस्ट्रिक्ट ३१३ च्या वतीने पनवेल रेल्वे स्टेशन येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. शिबिरात ७७ रक्तदात्यांनी रक्तदान करून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

केईएम ब्लड बँक, पनवेल रोटरी क्लब, कळंबोली रोटरी क्लब, गुरुकुल एज्युकेशन अँड कल्चरल ट्रस्ट आणि साई संस्कार स्पोर्ट्स अँड कल्चरल फाउंडेशन या सर्वांच्या सक्रिय सहकार्य व सहभागाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. समाजसेवेचा संदेश देणाऱ्या या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. समाजसेवेचा संदेश देणाऱ्या या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून विविध स्तरांतून शिबिराचे कौतुक होत आहे. महिलांच्या नेतृत्वाखाली कार्यरत इनरव्हील संस्था सातत्याने समाजहिताचे उपक्रम राबवत असून, हे रक्तदान शिबिर त्याचेच एक प्रेरणादायी उदाहरण ठरले आहे.




## पाथरी येथे ओ बी सी एकवटले , तहसीलदार यांना निवेदन

**दैनिक युवक आधार**
**पाथरी:- तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे**

तालुक्यातील सकल ओ बी सी अलुतेदार बलुतेदार समाजाच्या वतीने दि २ सप्टेंबर रोजी पाथरी तहसीलदार व पोलीस स्टेशन पाथरी यांना ओ बी सी च्या आरक्षणाला धक्का न लावण्याची मागणीचे निवेदन देण्यात आले आज शासकीय विश्रामगृह येथून मेन रोड पासून तहसील कार्यालय पर्यंत हजारो ओ बी सी समाज मोठ्या प्रमाणात उपस्थित होते यावेळी सकल ओ बी सी समाजाच्या प्रतिनिधीने ओ बी सी आरक्षणाला लागली घुसखोरी होता कामाने व सर्व ओ बी सी समाजाने आता जागृत होण्याची वेळ आपल्या वर आली असून ओ बी सी समाजावर होणारा अन्याय हाणुन पाडण्यासाठी संघटीत व्हा असे आवाहन यावेळी ओ बी सी लोकप्रतिनिधीने आपले मनोगत व्यक्त करताना केले

## दक्षता,दुर्वेश फ्लॉव्हर्स सेंटर व्यवसायिक सौ.सिद्धी सचिन ओमले यांच्या वतीने विविध क्षेत्रातील मान्यवरांचा मार्गदर्शन व गुणगौरव सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**मुंबई,(केतन भोज)**

;दक्षता,दुर्वेश फ्लॉव्हर्स सेंटर व्यवसायिक सौ.सिद्धी सचिन ओमले यांच्या वतीने बेलघर /तळघर ग्रामस्थ,मुंबईकर,महिला मंडळ,तरुण वर्ग,के.सी.सी बॉईज क्रिकेट संघ यांच्या उपस्थितीत इयत्ता पहिली ते ग्रॅज्युएशन मध्ये उत्तीर्ण झालेल्या विध्यार्थ्यांचा शिक्षण,रोजगार,व्यवसाय मार्गदर्शन व गुणगौरव सोहळा तळा तालूका,बेलघर/तळघर येथे शुक्रवार (ता.२९) रोजी ठिक दुपारी २ वाजता अतिशय सुनियोजित



वेळेत यशोचित पार पडला.या कार्यक्रमास गटविकास अधिकारी महादेव शिंदे यांची प्रमुख उपस्थिती लाभली असून मुख्य मार्गदर्शक म्हणून महेश अंबावले सर यांचे मार्गदर्शन होते. तसेच या कार्यक्रमासाठी बेलघर/तळघर गावातील प्रमुख पाहुणे म्हणून कार्यकारणी पदाधिकारी मंडळी,पोलीस पाटील ,विध्यार्थी वर्ग,ग्रुप ग्रामपंचायत चरईखुर्द ग्रामसेवक, सरपंच, सदस्य, सदस्या,के. सी.सी बॉईज क्रिकेट संघ कर्णधार/उपकर्णधार यांचे मोलाचे सहकार्य लाभले.



ठिकाण -मु. विठ्ठलनगर, पेण रायगड येथील-अर्जुनचा बंगला येथे विराजमान झालेली श्री गणरायाची मनमोहक मूर्ती.... 100 वर्षाची परंपरा असणारा "एक घराणा -एक गणपती" म्हणून पंचक्रोशी विभागात येथील गणेशोत्सव ओळखला जातो.
**( दैनिक युवक आधार )**

# निफाड पोलिसांचा धडाकेबाज सर्च ऑपरेशन : ८ किलो गांज्यासह इसम अटक

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

नाशिक ग्रामीन जिल्हा पोलीस अधिक्षक बाळासाहेब पाटील, यांनी नाशिक ग्रामिण जिल्हा अमंली पदार्थ मुक्त करण्याबाबत सर्व प्रभारी अधिकारी यांना सुचना दिलेल्या आहेत. तसेच त्याबाबत मार्गदर्शन करुन कठोर कारवाई करण्याची आदेशीत आहे. त्या अनुषगाने दि.२६ ऑगस्ट २०२५ रोजी १४-२५ वाजता पो.शि.३१४४ योगेश हिरामण आव्हाड यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की गणेश राऊत रा.पेठगल्ली निफाड ता. निफाड याने त्याचे गणेश किराणा दुकानात लाकडी दरवाज्याच्या पाठीमागे असलेल्या काळ्या रंगाचे बॅगमध्ये ०८ किलो वजनाचा गांजा आहे



बाबत खात्रीशिर बातमी मिळाल्याने पोलीस निरीक्षक गणेश गुरव, सहाय्यक पोलिस निरिक्षक सोनल फडोळ, पोलिस हवालदार. ६०९ किरण ढेकळे, पो.हवा. २४९५ कपालेश्वर ढिकले, पो.हवा. २४२६ अनिल शेरेकर, मपोना २७१६ सारिका जाधव, पो.शि. २९४१ राजेंद्र दरोडे, पो.शि. २६०२ विक्रम लहाणे, पो.शि.२८४३ विनोद जाधव, पो.शि.२८५७ धनंजय बैरागी असे पेठगल्ली गणेश किराणा दुकान येथे असलेल्या इसमास पोलीसांची व पंचांची ओखळ करुन देवुन त्यास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव संदिप उर्फ गणेश आशोक राऊत वय ४५ वर्ष रा. पेठगल्ली निफाड ता.निफाड जि. नाशिक असे सांगितले असता त्याचे गणेश किराणा दुकानातील लाकडी दरवाज्याच्या पाठीमागे असलेल्या काळी रंगाची बँक चेक केली असता त्यात खालील प्रमाणे गांजा मिळुन आला त्याचे वर्णन खालील प्रमाणे.

१) पॅकेट नंबर ०१ चे वजन ०२ किलो ०५ ग्रॅम पॅकेट २) पॅकेट नंबर ०२ चे वजन ०१ किलो ९९४ ग्रॅम ३) पॅकेट नंबर ०३ चे वजन ०१ किलो ९९७ ग्रॅम ४) पॅकेट नंबर ०४ वजन ०२ किलो १६ ग्रॅम

१,६०,२४०/-रुपये किं. (प्रत्येकी २००००/- किलो ग्रॅम) वरील प्रमाणे मुद्देमाल जप्त करुन पो.शि. २०२६ विक्रम बाबुराव लहाणे यांचे फिर्यादीवरुन गुरनं २९९/२०२५ एन.डी.पी.एस.८ (क), २० (ब) (II) प्रमाणे गुन्हा दाखल करुन आरोपीस अटक करण्यात आली आहे. त्यामध्ये आरोपीकडुन गुन्ह्यातील मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सपोनि सोनल फडोळ हे करीत आहे.सदर कारवाई नाशिक ग्रामिण जिल्हा पोलीस अधिक्षक श्री. बाळासाहेब पाटील, अपर पोलीस अधिक्षक श्री. आदित्य मिरखेलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. के. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे

# ओ.बी.सी.मध्ये मराठा समाजाची होणारी घुसखोरी थांबवण्यासाठी ओ.बी.सी. बांधवांच्या वतीने मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर....

**दैनिक युवक आधार**
**जालना /प्रतिनिधी**

ओ.बी.सी. मध्ये मराठा समाजाची होणारी घुसखोरी थांबवण्यासाठी ओ.बी.सी.समाजाच्या वतीने उपविभागीय अधिकारी परतूर मार्फत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले आहे.भारतीय राज्यघटनेने सामाजिक, आर्थिक दृष्ट्या पिडीत, वंचीत घटकांना आरक्षणाची तरतुद केली. ही करत असतांना घटनात्मक दृष्टया नेमलेल्या आयोगांचे सर्वेक्षण आणि घटनात्मक तरतुदीनुसार समाजाच्या मुख्य प्रवाहापासून कोसो दूर असलेल्या घटकांना मुख्यप्रवाहात आणण्यासाठी मंडल आयोगाच्या तरतुदी नुसार इतर मागासवर्गीय घटकातील 12 बलुतेदार ,18 अलुतेदार दल, वंचीत, पिडीत मागास घटकांतील हजारो जातींना ओ.बी सी. प्रवर्गात समाविष्ट करण्यात आले. वर्षानुवर्ष प्रस्थापितांची गुलामी करत या प्रवर्गातील अनेक जातीतील समुदाय जगलेला आहे.मंडल आयोगाच्या अंमलबजावणीनंतर या प्रवर्गाला शिक्षण, प्रशासन आणि राजकारण यात लोकसंख्येच्या निम्या प्रमाणात म्हणजे 27% आरक्षण प्राप्त झालेआहे. हगारो वर्षापासून प्रस्थापितांची चाकरी करण्यात त्यांनी गेलेल्या या समाजाला काही अंशी प्रतिनिधित्व मिळत असतांनाच मनोज जरांगे यांच्या माध्यमातून बेकायदेशीररित्या माणसे गोळा करुन घटनाबाहय आंदोलनाच्या माध्यमातून शासनावर दबावतंत्र वापरुन ओ.बी सी. आरक्षण संपवण्याचा एक कलमी कार्यक्रम महाराष्ट्रात सध्या चालु आहे. आर्थिक, सामाजिक, राजकीय दृष्ट्या प्रबळ असलेल्या मराठा समाजाचा ओ.बी.सी. प्रवर्गात समावेश करण्यासाठी शिदे समीतीच्या माध्यमातून 59 लाख बोगस कुणबी नोंदीची घुसखोरी झाल्याने ओ.बी.सी . बेकायदेशीर आंदोलनाने अगोदरच होरपळलेला आहे. यामुळे शासनाने दबाव तंत्राला बळी पडुन 59 लाख नोंदीद्वारे मराठा समाजाला ओ. बी. सी मध्ये आणुन मोठ्या प्रमाणात



ओ. बी. सी. वर अन्यायच केला आहे आणि आता सध्या मुंबई मध्ये मनोज जरांगे यांच्या बेकादेशीर आणि बळाचा वापर करुन होत असलेल्या आंदोलनापुढे झुकुन परत न्या. शिंदे समितीला मुदतवाढ देवून एक प्रकारे मूळ ओ. बी. सी. प्रवर्गातील दुर्बल घटकांचे अस्तित्व नष्ट करण्याच्या प्रवृत्तीला शासन एक प्रकारे सहाय्य करत आहे.

त्यामुळे सरकारने दबावा खाली न येता घटनात्मक बाचींचा विचार करुन ओ.बी.सी.मध्ये मराठा समाजाची होत असलेली घुसखोरी थांबवावी, ओ. बी. सी. प्रवर्गात अत्यंत अस्वस्थता आहे. जर आपण ओ.बी सी.वर अन्याय केला तर ओ.बी.सी. समाज सुध्दा रस्त्यावर उत्तरल्या शिवाय राहणार नाही याची नोंद घेवून ओ. बी.सी. च्या भावना समजुन ओ.बी. सी.प्रवर्गात मराठा समाजाचा शिरकाव होण्यापासुन रोखावे, अन्यथा यामुळे अस्वस्थ ओ.बी.सी. समाज तीव्र आंदोलनाचा मार्ग अवलंबवेल व त्या नंतर होणाऱ्या परिणामाची जबाबदारी शासनाची असेल पाची नोंद घ्यावी. निवेदनात खालील मागण्या केल्या आहेत

1)शासनाने एस.ई.बी.सी. च्या माध्यमातून मराठा समाजाला अगोदरच 10% आरक्षण दिलेले आहे. त्यामुळे ओ.बी.सी. मध्ये नव्याने घातलेल्या 59 लाख नोंदी तात्काळ रद्द कराव्यात.

2) न्या. शिंदे समिती पक्षपातीपणे काम करत आहे. त्यामुळे ही समिती बरखास्त करण्यात यावी.

3) ओ.बी.सी. प्रवर्गासाठी असलेल्या महामंडळांना हेतुपुरस्कर अल्पनिधी दिला जातो. हा अन्याय दुर करुन आवश्यक निधीची तरतुद करण्यात याव्यात. या निवेदनावर वंचित बहुजन आघाडीचे नेते श्री रामप्रसाद थोरात, गौतम खंडागळे ,चोखाजी नाना सौंदर्य, प्रसाद मगर,परमेश्वर ढवळे, संतोष सातोणकर,दीपक मुजमुले,भाऊसाहेब पोटे,शिवाजी उबाळे ,श्रीकांत उबाळे, शिवानंद कुकडे ,तुकाराम जईद ,मोहन भोकरे,शिवाजी तरवटे, भारत आवटे, दयाराम काळे, दत्ता राऊत, सिद्धेश्वर राऊत, गोविंद तरासे,संतोष कोरडे, गजानन माने,योगेश भोकरे, सखाराम पाटोकर, सुधाकर दवंडे, वैजनाथ डोने, कमलाकर झरेकर, दिगंबर डोने, भगवान उगले,एकनाथ टोम्पे, सोपानराव टोम्पे ,जालिंदर गिरी ,ज्ञानेश्वर चिंचाने, भागवत कोकाटे, दत्ता घोडे, मुंजा भोकरे,हनुमान धापसे, मधुकर गोरे, कृष्णा शेळके,भगवान इंगळे, मधुकर झरेकर ,इंद्रजीत घनवट, राधाकिसन माने ,पद्माकर गोरे, रामेश्वर कोटे ,रामकिसन राऊत ,प्रकाश आंबेकर,रामेश्वर तरासे,अरुण तरासे सुधाकर पडळकर मदनराव हजारे विकास पाडेवार नितेश राठोड महादेव राऊत दिगंबर गायकवाड , अशोक दवंडे, सोपान गायकवाड, मनोहर उगले, गजानन राऊत, नामदेवराव पोटे, भागवतराव कडपे, शिवाजीराव इंगळे , प्रल्हाद राऊत, लक्ष्मण काळे, हनुमान काळे, परमेश्वर पोटे, ईश्वर थोरात, जगदीश काळे, रामजी कोरडे, विलास डोईफोडे ,गुलाबराव वाघमारे, केशव वाघमारे, श्याम मुळे ,मनोहर काळे, प्रा संजय राठोड, दिनेश बोरकर, रखमाजी बोरकर, संतोष कोरडे, जगदीश काळे, रामेश्वर मोगरे ,हनुमान दराडे, दादासाहेब बोरकर, राजू राऊत, श्रीकांत बोरकर, महादेव झरेकर, गजानन माने, अमोल राठोड, किशोर राठोड, धोंडीराम काळे, मनोहर गाढवे, दिगंबर गाढवे, प्रकाश उबाळे इत्यादी ओ.बी.सी. बांधव उपस्थित होते.

# पहेला ते चिखलपहेला रस्त्याची दयनीय अवस्था

## खड्ड्यात रस्ता की रस्त्यात खड्डा

### जिल्हा प्रशासनाने लक्ष देण्याची गरज

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे विशेष प्रतिनिधी**

भंडारा –भंडारा तालुक्यातील पहेला येथून दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या चिखलपहेला रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था असून रस्त्यात खड्डा की खड्ड्यात रस्ता अशा प्रकारची या रस्त्याची दयनीय अवस्था आहे. मागील दोन वर्षापासून मीडियाच्या माध्यमातून त्याचप्रमाणे स्थानिक जनतेकडून, ग्रामपंचायत कडून,मागणी करण्यात येत आहे परंतु जनप्रतिनिधी ,जिल्हा प्रशासन, यांचे या रस्त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत आहे. या रस्त्याने साधी टू व्हीलर चालवता येत नाही .ठीकठिकाणी खड्डे पडले असून खड्ड्यात पाणी साचलेले आहे रात्रीच्या वेळेस आपलं टू व्हीलर वाहन किंवा फोर व्हीलर वाहन कसे चालवायचे हा सुद्धा जनतेला प्रश्न पडलेला आहे . सरकार शहर स्मार्ट झाले पाहिजे याकरिता प्रयत्न करीत आहे परंतु गाव खेड्यातील रस्ते ज्या रस्त्याने ग्रामीण भागात राहणारा शेतकरी जो अन्नधान्याचे उत्पादन करतो त्यांना जाण्याकरिता व्यवस्थित रस्ते नाही. त्यामुळे शासनाने शहर स्मार्ट बनविण्यापेक्षा खेडे स्मार्ट बनवावे, कारण खनिज संपत्ती खेड्यात आहे.त्यामुळे संबंधित विभागाने या रस्त्याकडे तात्काळ लक्ष केंद्रित रस्त्याचे डांबरीकरण करण्यात यावे अशी मागणी करण्यात येत आहे.



# लहान मुलांसाठी गणेश मूर्ती व चित्रकला स्पर्धा उत्साहात

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित**

श्रीवर्धन तालुक्यातील गालसुरे काठी गावात लहान मुलांच्या सृजनशीलतेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि पर्यावरणपूरक सण साजरा करण्याचा संदेश देण्यासाठी यावर्षीही गणेश मूर्ती बनवण्याची तसेच चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमात मुलांना माती किंवा इतर पर्यावरणपूरक साहित्य वापरून गणपतीच्या मूर्ती तयार करून सजवण्याची संधी देण्यात आली. गेली तीन वर्षे सातत्याने या स्पर्धांचे आयोजन केले जात असून, यंदाही कु. विभा संकेत मांजरेकर, श्री. अजय पालेकर व त्यांच्या सहकाऱ्यांच्या पुढाकाराने या स्पर्धा घेण्यात आल्या.

याचबरोबर मुलांसाठी “गणपती बाप्पा चित्रकला स्पर्धा” आयोजित करण्यात आली होती. यात मुलांनी गणपतीचे चित्र रेखाटून त्यात सुंदर रंग भरले. एकूण १५ ते २० मुलांनी या दोन्ही स्पर्धांमध्ये सहभाग घेतला. सहभागी मुलांनी कलात्मक मूर्ती तयार करून तसेच रंगीत चित्रे रेखाटून उपस्थितांचे मन जिंकले. या कल्पक प्रयत्नांमुळे सर्व स्पर्धकांचे सर्वत्र कौतुक होत आहे. विजेत्यांना शालेय उपयोगी साहित्य भेटवस्तू स्वरूपात बक्षीस म्हणून प्रदान करण्यात आले.











# ओडिशा येथे अनुसूचित जाती आणि जमाती कल्याण समित्यांच्या राष्ट्रीय परिषदेत आमदार राजु तोडसाम सहभागी

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-**
**जितेंद्र खोडे**



**पांढरकवडा:-केळापूर-आर्णी** विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रा.राजु तोडसाम यांनी त्यांच्या दोन दिवसांच्या वास्तव्यादरम्यान भुवनेश्वर (ओडिशा) येथे आयोजित एससी एसटी कल्याण समित्यांच्या राष्ट्रीय परिषदेत भाग घेतला.लोकसभा सचिवालयाच्या वतीने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी केळापूर–आर्णी विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रा.राजु तोडसाम म्हणाले की,समानता,आदर आणि न्यायाच्या भावनेने प्रेरित ही परिषद केवळ एससी एसटी वर्गाच्या सक्षमीकरणाचे साधन नाही तर लोकशाहीला समाजातील शेवटच्या व्यक्ती पर्यंत नेण्याच्या दिशेने एक ऐतिहासिक पाऊल आहे.आमदार तोडसाम यांनी असेही सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वा खालील केंद्र सरकार गरीब,शोषित, वंचित आणि मागासवर्गीयांच्या स्वप्नांना साकार करण्यासाठी सतत काम करत आहे.महाराष्ट्रामध्ये विकसित भारत २०४७ चे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी केलेल्या प्रयत्नांचे त्यांनी कौतुकही केले.

# महसूल सहाय्यक सेवानिवृत्त दिपक साठे यांचा तहसीलदार तेजनकर मॅडम यांच्या हस्ते सत्कार.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील**



**मालेगाव -** तालुक्यातील मेडशी येथील श्री दिपक रामभाऊ साठे हे महसूल विभाग तहसील कार्यालय रिसोड येथे सेवानिवृत्त झाले. या निमित्ताने तहसीलदार प्रतिक्षा तेजनकर मॅडम यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मालेगाव तालुक्यातील मेडशी येथील श्री. दीपक रामभाऊ साठे यांचा जीवन प्रवास दि. 18 नोव्हेंबर 1983 / रोजी सुरवातीला कोतवाल या पदावर कार्यरत झाले. त्यानंतर दि. 4/0 जुलै 2006 रोजी चतुर्थ श्रेणी मध्ये बढती मिळाली. त्यानंतर 15 ऑगस्ट 2013 रोजी महसूल सहाय्यक पदी बढती मिळाली. त्यानंतर 2023 मध्ये कालबद्ध पदोन्नती आणि दि 31 ऑगस्ट 2025 रोजी सेवानिवृत्त झाले. श्री दिपक रामभाऊ साठे यांचा रिसोड तहसीलदार स्टॉफच्या वतीने श्री दिपक रामभाऊ साठे व यांच्या परिवाराचा सत्कार करण्यात आला यावेळी माननीय तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर मॅडम, जवादे साहेब नायब तहसीलदार निवासी, कुळमेते साहेब नायब तहसीलदार महसूल,
तागडे साहेब निरीक्षण अधिकारी रिसोड, डोंगरे साहेब, सुधाकर पडघान, प्रताप साबळे, गजानन देशमुख, सुधाकर रणखांब, भगवान शिंदे, बी. के. मानमोठे, प्रवीण पांढरे, पवार मॅडम, सोनवणे मॅडम, कंटाळे मॅडम, सतीश सोनवणे, प्रदीप कांबळे, गजानन कांबळे, राहुल कांबळे, विष्णू येलते , संतोष बोडके, रामा इरतकर, नितीन खैरे, खाडे यांना विश्वनाथ घनगाव आणि सर्व मंडळ अधिकारी आणि सर्व ग्राम महसूल अधिकारी व त्याच्या सर्व महसूल सेवक सर्व स्टॅम्प वायंडर् सर्व वायंडर् दौलत अंभोरे सर्वांनी निरोप समारंभ दिला.

श्री दिपक रामभाऊ साठे यांचा परिवार घनश्याम साठे, कौशल्या साठे, सुनिता साठे, शलिनि साठे, आरती साठे, निलेश साठे, सचिन साठे, अनुराग साठे, स्वस्तिक साठे, आरुष साठे, अवनि साठे, ओजस्वी साठे, मुलगी हिना रामदास थोरात, रामदास भिकाजी थोरात ,गणेश थोरात, समर्थ थोरात, प्रियंका पारवे, ऋथ्वी पारवे साठे परिवार आहे.

# पुण्यस्मरण देवमाणसाचे ; स्व.नामदेव पांडुरंग शिरढोणकर 08 वे पुण्यस्मरण

**दैनिक युवक आधार**
**नविमुंबई वार्ताहर**

०८ सप्टेंबर २०२५ रोजी स्व. नामदेव कान्हाई पांडुरंग शिरढोणकर शिवभूमी ०८ वे पुण्यस्मरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे .स्व.नामदेव शिरढोणकर आदर्श शिक्षक,मुख्याध्यापक,१००%
समाजसेवक, कुष्टरोगी निमुर्लन सोबती म्हणून लोकसेवेतून आपलं जीवन कार्य जगत होते. वृक्षमित्र,वारकरी, आद्य क्रांतिकारकांचे खरे
समर्थक ज्यांचे पूर्वज ब्रिटिशांच्या विरोधात ते लढलेले स्व. नामदेव शिरढोणकर म्हणजे पूर्वीचे आडनावाने मुकादम १६० वर्षाच्या प्रधिर्ग काळा नंतर ते शिरढोणकर म्हणून ओळखले गेले.कर्मभूमी शिरढोणगाव तर कुलदेवत कोंबडभुजे,शिवभूमी रायगड येथे त्यांचा जन्म १५ जुलै १९३३ व स्वर्गवास ०८ सप्टेंबर २०१७ रोजी झाला. या आठव्या पुण्यस्मरण कार्यक्रमाच्या निमित्ताने आयोजक शिरढोणकर परिवाराने 8 सप्टेंबर रोजी स्व. दि बा पाटील भूमिपुत्र भवन उलवे येथे विविध लोकपयोगी सामाजिक कार्य करण्यात येणार आहे. वृक्षारोपण, भजन ,सामाजिक प्रबोधनकार करीत देश,धर्म गीतांचा कार्यक्रम व त्यातून जागरूकता निर्माण व्हावी या उद्देशाने भूमिपुत्रांच्या संवाद असे विविध उपक्रम या पुण्यस्मरण सोहळ्या निमित्ताने नियोजित केला आहे. पुण्यस्मरण निमित्ताने शिरढोणकर परिवार सदस्य राजेंद्र व विजय हे दोन सुपुत्र कुटुंब प्रमुख तसेच नातवंडे सिद्धेश, विश्वेश्वर, सार्थक प्रशांत म्हात्रे, जयेश पाटील व अन्य शिरढोणकर मित्र परिवार या कार्यक्रमाच्या ठिकाणी सेवेत स्वतः उपस्थित राहणारआहेत तरी आपण या पुण्यस्मरण सोहळ्यास उपस्थित राहून शिरढोणकर परिवारास आशीर्वाद द्यावे अशी प्रार्थना हि करण्यात येत आहे.यावेळी ऍड.वाय एस भोपी,अशोक बुआ म्हात्रे,रवी वाडकर, प्रशांत मुंबईकर,नाना गडकरी ,एकनाथ माळी यांच्या न्याय कलेतून सदर विविध कार्यक्रम ठेवण्यात आले आहे.




# 'महाराष्ट्र रत्न' हा माझा सन्मान नसून सर्व मतदार संघातील जनतेचा सन्मान आहे माजी मंत्री आ.संजय बनसोडे

**दैनिक युवक आधार**
**उदगीर प्रतिनिधी बालाजी तेलंगेः-**

शहरातील विविध गणेश मंडळातील गणेश भक्तांच्या आग्रहाखातर माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांनी श्री गणेशाची मनोभावे आरती केली व मतदारसंघातील जनतेच्या सुख समाधानासाठी श्री गणरायाकडे साकडे घातले.

यावेळी माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांचा विविध गणेश मंडळाच्या वतीने लंडन येथे 'महाराष्ट्र रत्न' पुरस्कार मिळाल्याबद्दल भव्य सत्कार करण्यात आला.

या सत्काराला उत्तर देताना आमदार संजय बनसोडे म्हणाले की,

मागील पाच वर्षाच्या कार्यकाळात मतदार संघाचा सर्वांगीण विकास केला. ही शक्ती केवळ आपल्या मतामुळे मिळाली. गेल्या १० वर्षात मी मतदार संघातील जनतेच्या सुख सोईसाठी रात्रंदिवस काम केले आहे. त्याची दखल घेवुन मला लंडन येथे 'महाराष्ट्र रत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा माझा सन्मान नसून सर्व मतदार संघातील जनतेचा सन्मान असल्याचे मत माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांनी व्यक्त केले. ते उदगीर येथील विविध गणेश मंडळाच्या भेटी दरम्यान मंडळाकडून केलेल्या सत्कार सोहळ्याप्रसंगी बोलत होते.

पुढे बोलताना आ.संजय बनसोडे यांनी, मतदारसंघातील जनतेने दिलेल्या पाठबळामुळेच हा प्रतिष्ठेचा पुरस्कार मला मिळाला असून आपल्या सत्कारामुळे मला पुन्हा काम करण्यासाठी ऊर्जा मिळाली आहे. सदर पुरस्कार हा मी माझ्या जनतेला समर्पित करतो अशी भावनाही आ.बनसोडे यांनी व्यक्त केली आहे.

यावेळी माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे,
प्रा. शाम डावळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष बालाजी भोसले पाटील, तालुका कार्याध्यक्ष वसंत पाटील, शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, शहर कार्याध्यक्ष शशिकांत बनसोडे, भाजपाचे माजी शहराध्यक्ष मनोज पुदाले, भाजपा शहराध्यक्ष अमोल अनकल्ले,माजी नगरसेवक विजय निटुरे, अनिल मुदाळे, अनिरुद्ध गुरुडे, गिरीश उप्परबावडे, ज्ञानेश्वर बिरादार येणकीकर, ज्ञानेश्वर पाटील रावणगावकर, प्रा.मल्लेश झुंगास्वामी, राजकुमार हुडगे, बबलू मुळे आदीसह मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# मेडिकव्हर हॉस्पिटलच्या वतीने गणेशोत्सवादरम्यान मोफत आरोग्य तपासणी

## गणेशोत्सव मंडळांमध्ये रक्तातील साखरेची पातळी, रक्तदाब, पीएफटी आणि डोळ्यांची तपासणी

**दैनिक युवक आधार**



**नवी मुंबई :** मेडिकव्हर हॉस्पिटलने गणेशोत्सवादरम्यान खारघरचा राजा पंडाल, स्वप्नपूर्ती सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, श्री सिद्धिविनायक सांस्कृतिक मंडळ आणि बाल गणेश मित्र मंडळ या चार गणेशोत्सव मंडळांमध्ये मोफत आरोग्य तपासणीचे आयोजन करत सामुदायिक आरोग्याच्या दृष्टीने एक अर्थपूर्ण पाऊल उचलले आहे. या मंडळांमध्ये सायंकाळी ५:०० ते रात्री १०:३० वाजेपर्यंत फिरत्या रुग्णवाहिकेद्वारे प्रसार करण्यात आला. चांगल्या आरोग्याचा आशीर्वाद या संकल्पनेतंर्गत रुग्णालयाने भक्तांना उत्सवाचा आनंद घेताना त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यास प्रोत्साहित केले. या आरोग्य शिबिरात डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार रक्तातील साखर, रक्तदाब, बॉडी मास इंडेक्स (BMI), इलेक्ट्रोकार्डियोग्राम (ECG), फुफ्फुसांच्या कार्य चाचण्या (PFT) (दमा), डोळ्यांची तपासणी, फायब्रोस्कॅन, थायरॉईड संप्रेरक (TSH) अशा चाचण्या तसेच डॉक्टरांचा सल्ला यांचा समावेश होता. शिबिरांमध्ये सुमारे ५०० भाविकांनी आरोग्य तपासणी केली, त्यांच्या एकूण आरोग्य स्थितीबद्दल मौल्यवान माहिती मिळवली. सामान्य आरोग्य समस्यांबद्दल वेळीच निदान आणि जागरूकता वाढवून जीवनाचा दर्जा सुधारणे हा यामागचा उद्देश होता. गणेशोत्सव हा मुंबई आणि महाराष्ट्रात मोठ्या भक्तीने साजरा केला जातो, जिथे हजारो भाविक एकत्र येतात तसेच दर्शनासाठी विविध मंडळांना भेट देतात. या उत्सवादरम्यान भाविकांनी त्यांच्या आरोग्याकडे लक्ष देणे तितकेच महत्त्वाचे आहे, कारण शरीर निरोगी असेल तर आपल्याला हा सणउत्सवाचा खराखुरा आनंद लूटता येतो. मेडिकव्हर हॉस्पिटलने उत्सवादरम्यान मोफत आरोग्य तपासणी करून आरोग्याच्या दिशेने सकारात्मक पाऊल उचलले आहे, ज्यामुळे भाविकांना बाप्पाच्या आशीर्वादाबरोबच चांगल्या आरोग्याची भेट मिळाली आहे. गणेशोत्सव हा आनंद, भक्ती आणि उत्सवाचे प्रतीक आहे. भक्त बाप्पाचे आशीर्वाद घेतात, परंतु हे देखील लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे की चांगले आरोग्य हे सर्वांत मोठा आशीर्वाद आहे. या मोफत तपासणीद्वारे उपस्थित नागरिकांना त्यांच्या आरोग्याची स्थिती जाणून घेण्याची संधी मिळाली. या गणेशोत्सवात प्रत्येकाला चांगल्या आरोग्याचा आशीर्वाद मिळाल्याची प्रतिक्रिया *जनरल फिजीशियन डॉ. बादल ताओरी* यांनी स्पष्ट केले. सण–उत्सव काळा हा जागरूकता पसरवण्यासाठी आणि लोकांना स्वतःच्या आरोग्याची काळजी घेण्यास प्रोत्साहित करण्यासाठी योग्य वेळ ठरत आहे. प्रत्येकाला निरोगी आणि आनंदी जीवन जगता यावे यासाठी आम्ही सदैव प्रयत्नशील राहु, *असे मेडिकव्हर हॉस्पिटल्सचे केंद्र प्रमुख डॉ. माताप्रसाद गुप्ता यांनी स्पष्ट केले.*

# सर्वधर्मसमभाव दाखवून दिले माणुसकीचे दर्शन...

## चक्क मुस्लिम समाज सेवक रशिद शेख व त्यांच्या पत्नीने केली श्री.गणेशाची आरती

**दैनिक युवक आधार**
**उल्हासनगर/रशीद शेख**



तालुक्यातील माहरळगाव येथील
प्रमोद काळे साहेब सामाजिक युवा कार्यकर्ते आणि सामाजिक बांधिलकी जोपासण्याची आवड असलेले तसेच अनेक रुग्णांना विविध प्रकारचे सामाजिक कार्यक्रम राबविणारे शालीय साहित्य गोरं गरिबांच्या मुलांना शाळेत जाऊन वाटप करणे माहरळ गावांमध्ये ग्रामीण भागात नावाजलेले आहेत सपना काळें हर्षदा काळे अर्जुन काळे हारीओम समाधान पाटील निरझरा पाटील योगेश पालवे सर्वच गणेश भक्तांनी आशिर्वाद घेतलें आणि रशीद शेख समाज सेवक व दैनिक पत्रकार त्यांची पत्नी धर्म पत्नी सलीमाबी शेख गणपती बाप्पांचे दर्शन घेतले सर्व धर्म समभाव आहे असा संदेश समाजाला दिला आहे

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## भारज बुद्रुक येथे गणपती विसर्जन व ईद शांततेत पार पडाव्यात यासाठी जाफ्राबाद पोलिस प्रशासनाचा रूट मार्च

**दैनिक युवक आधार**
**वरूड सर्कल प्रतिनिधी ज्ञानेश्वर निकाळजे**

जाफ्राबाद तालुक्यातील मौजे भारज बुद्रुक येथे गणपती विसर्जन सोहळा ईद ए मिलाद हे दोन महत्त्वाचे सण शांततेत व उत्साहात साजरे व्हावेत, तसेच नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना दृढ राहावी यासाठी जाफ्राबाद पोलीस प्रशासनाच्या वतीने भारज बुद्रुक येथे भव्य रूट मार्च काढण्यात आला.

पद्धतीने पोलीस दलाने पथसंचलन केले टवटवीत गणवेशातील पोलिसांचे पथसंचलन पाहून नागरिकांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण झाले गणेश ऊत्सव व ईद ए मिलाद या दोन्ही सणांचा कालावधी हा सामाजिक सलोखा टिकवण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा असल्याचे पोलिस प्रशासनाने अधोरेखित केले

नागरिकांनी शांतता, व एकोप्याची परंपरा जपत उत्सव साजरे करावेत असे आव्हान पोलीस



हा रूट मार्च २ सप्टेंबर रोजी जाफ्राबाद पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक एस एस जाधव साहेब पी एस आय पवार साहेब आणि वैद्य साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला ह्या रूट मार्च ची सुरुवात श्री शिवाजी विद्यालया मेन रोड पासून डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक तसेच ग्रामपंचायत रोड सुखापुरी माता नगर आदी भागातून शिस्तबद्ध

निरीक्षक एस एस जाधव साहेब यांनी यावेळी केले रुट मार्च दरम्यान नागरिकांनीही पोलीस दलाचे स्वागत केले त्यामुळे गावात सुरक्षितता व शांततेचे वातावरण अधिक दृढ झाले असून आगामी सणा वार आनंदात आणि शांततेत पार पडतील असा विश्वास व्यक्त होत आहे

# नैताळे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी मोतीराम भवर यांची बिनविरोध निवड

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

निफाड नैताळे/रामपुर ग्रुप ग्रामपंचायतीच्या सर्व सदस्य मंडळाची अत्यंत महत्वाची बैठक आज ११ वाजता ग्रामपंचायत कार्यालयात बोलविण्यात आली होती सरपंच निशा पाठक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकित उपसरंचपदी मोतीराम वामन भवर यांची बिनविरोध निवड करण्यात आली सदर निवडीची घोषना होताच सर्व समर्थकाकडून मोठ्या प्रमानावर फटाक्याची आतिबाजी करण्यात आली.
\ नैताळे/रामपुर ग्रुप ग्रामपंचायतीच्या उपसरपंच सोनाली घायाळ यांनी अंतर्गत ठरलेल्या रोटेशन पध्दतीनुसार आपल्या उपसरपंच पदाचा राजीनामा दिला होता तो मंजुर झाल्याने नविन उपसरपंच पदाच्या निवडीसाठी आज ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच निशा पाठक यांच्या अध्यक्षतेखाली प्रक्रिया राबविण्यात आली उपसरंपच या पदासाठी मोतीराम वामन भवर यांनी आपले नामनिर्देशन पत्र दाखल केले होते त्यावर सुचक म्हणून राजेंद्र बोरगुडे तर अनुमोदन गायत्री बोरगुडे यांनी सही केली होती छाननीत सदरचे नामनिर्देशनपत्र योग्य व बरोबर



असल्याने ते मंजुर करण्यात आले तसेच विहीत मुदतीत फक्त एकच नामनिर्देशन पत्र दाखल झाल्याने मोतीराम भवर यांची बिनविरोध निवड झाल्याची घोषना निवडणूक अधिकारी तथा ग्राविकास अधिकारी उज्वला भोईर यांनी केली या बैठकीस सदस्य रश्मी बोरगुडे, सोनाली घायाळ, गायत्री बोरगुडे, राजेंद्र बोरगुडे ,नवनाथ बोरगुडे ,राजू पठाण ,मनिषा गवारे , मिराबाई गोधडे ,हे उपस्थित होते. नवनिर्वाचित उपसरपंच मोतीराम भवर यांचा ग्रामस्थाच्या वतीने सत्कार नैताळे/रामपुर ग्रुप ग्रामपंचायातीच्या उपसरपंचपदी मोतीराम भवर यांची बिनविरोध निवड झाल्यानंतर ग्रामस्थांच्या भव्य नागरी सत्कार यावेळी करण्यात आला यावेळी लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राजेंद्र बोरगुडे ,माजी सरपंच नवनाथ बोरगुडे , माजी चेअरमन शिवाजी बोरगुडे ,ज्ञानेश्वर घायाळ , ,दत्तु भवर ,देवीदास बोरगुडे ,योगेश बोरगुडे , राहुल बोरगुडे, किशोर बोरगुडे,संजय साठे ,नितीन बोरगुडे ,दिलीप घायाळ, सोपान बोरगुडे, जगन पाठक सदाभाऊ कोटकर,वैभव भवर ,नवनाथ भवर ,शांताराम भवर ,वामन भवर ,विश्वनाथ कोल्हे ,रविद्र बोरगुडे, सुरज भवर ,उदय भवर ,एकनाथ भवर,नामदेव भवर ,शंकर भवर ,वाल्मिक भवर,लक्ष्मण भवर,चांगदेव भवर,शिवाजी भवर,गणपत मुरकुटे ,राजाराम भवर, अरुन बोरगुडे बाळु शिंदे ,गणेश जाधव ,राजेंद्र खरे ,गणपत सुरासे ,भवर यांच्यासह मोठ्या प्रमानावर नागरीक उपस्थित होते.




– श्री उद्धव गोविंद माने यांनी यंदा लालबागचा राजाची प्रतिकृती मूर्ती / देखावा आपल्या राहत्या घरी बालाजी सिम्फोनी, सुखापुर, न्यू पनवेल येथे उभा केला आहे.
( दैनिक युवक आधार )

## सहकार भारती मुंबई व चाईल्ड ड्रीम सोशल फाउंडेशन रक्तदान शिबीराचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**मुंबई प्रविणभाऊ पवार**

सहकार भारती मुंबई पुर्व विभाग आणि चाईल्ड ड्रिम सोशल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गणेश उत्सवानिमित्त सोमवार दि. १ सप्टेंबर २०२५ रोजी ८७ बिझिनेस पार्क प्रीमाईसेस को ऑप सोसायटी, भांडुप (प), मुंबई या ठिकाणी श्री सत्यनारायणाची महापूजाचा महाप्रसाद व भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.
या शिबीर डॉ. आर. एन. कुपर रक्तपेढी हॉस्पिटल, संपूर्ण आरोग्य तपासणी शिबीर, डॉ. सुनील बारगे-सेंट्रल हॉस्पिटल, व चष्मा शिबीर निर्वाण आय केअर, आदी सर्व मोफत आयोजित केले होते. सदर प्रसंगी सहकारातील जेष्ठ नेते व मुंबई बँकेचे मा. अध्यक्ष विद्यमान संचालक शिवाजीराव नलावडे, सहकार भारती-मुंबई पूर्व विभाग चे महामंत्री चंद्रकांतजी पवार, पुष्पलता ताई मुळे, दिवाकरजी कोयंडे, मनमोहनजी शर्मा,




उज्वलाताई शिंदे, जितूजी मोरे रा. कॉ. पार्टी मुंबई, सुहासजी बने मा. संचालक मुंबई बोर्ड आदी सर्व मंडळी उपस्थित राहून कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार भारती मुंबई पूर्व विभाग चे संघटन प्रमुख संभाजी भोसले, ८७ प्रिमाईसेस सोसायटीचे रेवनाथ गायकवाड, दत्तात्रय पोटे, सुरज कांबळे यांनी खूप परिश्रम घेतले.

## आझाद तरुण मंडळाचा महिलांच्या होममिनिस्टर कार्यक्रमासाठी लाखोची बक्षीसे
### खेळ रंगला पैठणीचा. महिलांना यावंच लागतंय

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

सणसर गावातील आझाद तरुण मंडळाच्या वतीने शुक्रवारी 5 सप्टेंबर रोजी सायंकाळी 7 वाजता गणेश उत्सवानिमित्त महिलांसाठी होममिनिस्टर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून लाखो रुपयांची बक्षीस वाटप करण्यात येणार असल्याची माहिती मंडळाचे प्रविण शिंदे व स्वप्नील शिंदे यांनी दिली आहे.ग्रामीण भागातील महिलांच्या कला गुणांना वाव मिळून त्यांच्या ज्ञानात भर पडून त्यांना जगातील चालू घडामोडीची माहिती व्हावी म्हणून या उपक्रमाचे आयोजन केले असल्याची माहिती देण्यात आली.
प्रथम बक्षीस म्हणून फ्रिज द्वितीय बक्षीस म्हणून टीव्ही संच तृतीय बक्षीस म्हणून ओव्हान चतुर्थ बक्षीस कुलर असे एकूण आठ मोठे बक्षीसे ठेवण्यात आली असून तीन पैठणी वाटप करण्यात येणार आहेत या कार्यक्रमासाठी निवेदक म्हणून बारामतीचे प्रसिद्ध निवेदक अनिल सावळे पाटील यांची उपस्थिती राहणार आहेत. यावेळी सणसर गावातील दानशूर देणगीदार यांच्याकडुन बक्षीस रुपी मदत करण्यात आली असून मंडळाला नेहमी सढळ हाताने मदत करणारे जगदीश कांबळे पिंटू गुप्ते गणेश रायते, अतुल निंबाळकर आदी देणगीदार यांनी मदत केली असल्याचे सांगण्यात आले.यावेळी आझाद तरुण मंडळाच्या वतीने गावातील महिलांना आव्हान करण्यात आले की गावातील महिलांनी या कार्यक्रमासाठी मोठया प्रमाणात सहभागी होऊन कार्यक्रमाचा आनंद घ्यावा आणि लाखो रुपयांची बक्षीसे जिकूंन घेऊन जावीत अशी विनंती प्रविण शिंदे व सदस्यांनी मंडळाच्या वतीने गावातील महिलांना करण्यात आली आहे.



## विलास बडे सर, निलेश खरे सर व माधवी जुवेकर यांच्या उपस्थितीत 'दैनिक युवक आधार'चा दुसरा वर्धापन दिन सोहळा

**दैनिक युवक आधार**

**आष्टी (प्रतिनिधी)** : दैनिक युवक आधार या वृत्तपत्राचा दुसरा वर्धापन दिन सोहळा येत्या ७ सप्टेंबर रोजी मोठ्या दिमाखात पार पडणार आहे. या सोहळ्याला पत्रकारिता व कला क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.
या विशेष प्रसंगी आयबीएन लोकमतचे सहसंपादक विलास बडे, साम टीव्ही न्यूजचे संपादक निलेश खरे तसेच स्टार प्रवाहवरील 'हळद रुसली कुंकू हसलं' मालिकेतील ख्यातनाम अभिनेत्री माधवी जुवेकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.
कार्यक्रमाचे खास वैशिष्ट्य म्हणजे समाजकारण, शिक्षण, पत्रकारिता, कला, संस्कृती आणि सामाजिक कार्य या विविध क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे. यामुळे हा सोहळा प्रेरणादायी ठरणार आहे. स्थानिक मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार तसेच उत्साही युवक मोठ्या संख्येने या कार्यक्रमाला उपस्थित राहणार असून दैनिक युवक आधार वर्धापन दिन सोहळा समाजातील सकारात्मक कार्याला उजाळा देणारा ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.



येरोळ येथील बसस्टॅन्ड व गांधी चौकात मराठा समाजाला आरक्षण मिळाल्याचा जल्लोष फटाके वाजून व एकमेकांना पेढे वाटून साजरा करण्यात आला यावेळी सकल मराठा समाज व विविध जाती धर्मातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते
( दैनिक युवक आधार)

# अनसिंग येथे लोहार गणेश मंडळाला राजू पाटील राजे यांनी दिली भेट.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील**

**अनसिंग:-** लोहार गणेश मंडळ अनसिंग नवसाचा गणपती म्हणून ओळखला जातो तसेच वाशिम जिल्ह्याचे कार्यकारी अध्यक्ष भारतीय जनता पार्टी श्री राजू पाटील राजे लोहार गणेश मंडळ यांना भेट देऊन श्री गणेशाची पूजा केली व लोहार गणेश मंडळाचे अध्यक्ष यांच्या हाताने स्वागत करण्यात आले आहे श्री राजू पाटील राजे यांचे उपस्थित मान्यवर अनसिंग मंडळाचे अध्यक्ष भाजपा श्री संतोष भाऊ उगले सरचिटणीस साईनाथ वाघमारे दिगंबर कोरणे अनसिंग शहराध्यक्ष प्रभाकर उर्फ बाळू माल या सर्व मान्यवराचे स्वागत करण्यासाठी लोहार गणेश मंडळाचे अध्यक्ष दीपक लोहार राजेश लोहार व सुरेश हारिहर राम अंकुशकर अनसिंग मंडळ उपाध्यक्ष भाजपा गजानन नवगणकर लोहार समाजाच्या वतीने करण्यात आले आहे तसेच
भारतीय जनता पार्टी वाशिम जिल्हा कार्यकारी अध्यक्ष श्री राजू पाटील राजे यांनी गजानन नवगणकर यांच्या घरी सदिच्छा भेट



दिली आहे व सर्व गणेश भक्तांना शुभेच्छा दिल्या आहेत लोहार संघटनेचे वाशिम जिल्हा अध्यक्ष अशोक भाऊ कवाळे यांचे स्वागत करण्यात आले आहे राजेश लोहार यांच्या हस्ते तसेच 5 दिवसाचा गणपती असतो विसर्जन मिरवणूक मध्ये सामील झाले आहेत
वाशिम मंगरूळपीर विधानसभा चे लोकप्रिय आमदार श्री श्याम भाऊ खोडे त्यांच्यासोबत आलेली मंडळी व पदाधिकारी अनसिंग कृषी बाजार समितीचे सदस्य नाथजी कापसे प्रल्हादजी गोरे गिरधारी मुसळे बबलू अडाणी नवनाथ निरगुडे व तसेच सर्व गणेश भक्त आणि कार्यकर्ते उपस्थित होते अनसिंग मंडळ सोशल मीडिया अध्यक्ष गणेश राठोड रमेश भांडण राजेश वानखेडे ईश्वर शिंदे गणेश अमरावतीकर बाबुभाई गणी बागवान गजू कुटे रुपेश देशमुख संतोष खंदारे ऋषी कदम शुभम भालेराव योगेश सातव राजू कदम सुरेश खंडागळे नरेश खंडागळे विजू गायकवाड सुधाकर शिंदे विष्णू गादेकर अमोल गायकवाड अमोल पोहकर सागर गव्हाणे शुभम सोनवणे व तसेच सर्व गणेश भक्त आणि भाजपा पदाधिकारी अनसिंग मित्र मंडळ सर्व उपस्थित होते आणि महाप्रसादाचा लाभ सर्वांनी घेतला.

## झाडे लावा जीवन वाचवा' असा मोलाचा संदेश देत उंबरठाण महाविद्यालयाचा वृक्षारोपण कार्यक्रम यशस्वी

**दैनिक युवक आधार**
**राजेंद्र टोपले, सुरगाणा**

उंबरठाण महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने "एक पेड मां के नाम" या उपक्रमांतर्गत वृक्षरोपणाचे आयोजन करण्यात आले. प्रत्येकाने आपल्या मातृभूमीच्या नावे एक झाड लावून पर्यावरण संवर्धनामध्ये आपला सहभाग वाढविणे या उद्देशाने कार्यक्रम घेण्यात आला. एक झाड लावणे म्हणजे एका व्यक्तीचे जीव वाचवण्याइतके मौल्यवान कार्य आहे. आपण स्वतः पर्यावरणाचे संवर्धन करायला हवं असे आवाहन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक हेमलता महाले यांनी केले. महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य कलावती थविल यांच्या हस्ते आणि विद्यार्थी स्वयंसेवक यांच्याही हस्ते महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यामध्ये चिंच,फणस,जांभूळ, पेरू, चाफा, सिताफळ, आंबा आणि बांबू अशा विविध ५५ रोपांची लागवड करण्यात आली. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य कलावती थविल, प्रा. सुभाष पवार,प्रा. मधुकर गावित, प्रा. हेमलता महाले, प्रा. उमाताई देशमुख, प्रा. मंदिप राऊत, प्रा. तुळशीराम चौधरी, प्रा. राजेश पेटार,प्रा. राजाराम कणसे शिक्षकेतर कर्मचारी अनिल कदम, अनिल ठाकरे, हिरामण गावित, यशोदा गावित आणि विद्यार्थी उपस्थित होते.





# दोन अपघातात दोघांचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

पनवेल परिसरात गेल्या दोन दिवसांत घडलेल्या दोन वेगवेगळ्या अपघातांत दोन जणांचा मृत्यू झाला आहे. कामोठे, कळंबोली पोलिस ठाण्यांत या अपघातांची नोंद करण्यात आली आहे. या अपघातांना जबाबदार वाहनचालकांवर पोलिसांनी पुढील कारवाई सुरू केली आहे. ३० ऑगस्ट रोजी रात्री साडेनऊ वाजताच्या सुमारास घडलेल्या पहिल्या अपघातात मंगल चौधरी (४५) या पादचाऱ्याचा मृत्यू झाला. या अपघातातील आरोपी अमोल कोळी (२९) हा रात्री भरधाव वेगाने कारने कळंबोली सर्कलकडून गव्हाणकडे जात होता. यावेळी ट्रायसिटी, खांदा कॉलनी येथून रस्ता ओलांडणाऱ्या पादचारी मंगलला गाडीने जोराची धडक दिली. या अपघातात चौधरी गंभीर जखमी झाल्याने त्याचा मृत्यू झाला. ३० ऑगस्ट रोजी रात्री त्याच सुमारास शीव-पनवेल महामार्गावर स्कूटरचालकाने कळंबोली येथील उड्डाणपुलावर दुसरा अपघात घडला. पनवेलच्या दिशेने जाणाऱ्या बेदरकारपणे वाहन चालवत पुढे असलेल्या स्कूटरला जोरात धडक दिली. या अपघातात विश्वनाथ भगत (३०) व त्याची आई बालीका भगत (५०) या दोघी खाली पडून गंभीर जखमी झाल्या. कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात त्यांना दाखल करण्यात आले होते. ३१ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता बालीका भगत यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

# डॉ. गुजर सुभाष हायस्कुलमध्ये शालेय मंत्रीमंडळाची स्थापना उत्साहात करण्यात आली.

**देवळाली कॅम्प,प्रतिनिधी**

येथिल शंकर एजुकेशन सोसायटी संचलित डॉ. गुजर सुभाष हायस्कुलमध्ये सामान्य प्रशासन मंत्री, सुरक्षा मंत्री, सांस्कृतीक मंत्री, क्रीडा मंत्री, आरोग्य मंत्री, पर्यावरण मंत्री, कौशल्य विकास मंत्री, सार्वजनिक कार्यक्रम मंत्री, पालक व जनसंपर्क मंत्री, शिक्षण मंत्री अशा शालेय मंत्रीमंडळाची स्थापना करण्यात आली. निवडणुकीसाठी एकुण ७६४ पैकी ५२९ विद्यार्थ्यांनी मतदान केले. त्यापैकी २४ मतं बाद निघाले. मतदानाची टक्केवारी ६६.०९ % असल्याची माहिती निवडणुक अधिकारी प्रियंका आहुजा, भाग्यश्री चावला, गौरव आमेसर यांनी दिली. सामान्य प्रशासन मंत्री साठी रिया मन्सुरी, रिशान खान, भूमी चव्हाण या विद्यार्थांनी उमेदवारी केली होती त्यापैकी रिया मन्सुरी या उमेदवाराला २१० मते मिळवुन विजयी घोषित करण्यात आले. सुरक्षा मंत्री साठी मोहम्मद रियान शाह, करिश्मा शर्मा, राशी अल्हाटे, आराधना ससाने, अन्सारी सायरा या विद्यार्थ्यांनी उमेदवारी केली होती त्यापैकी मोहमद रियान शाह या उमेदवाराला १६५ मते मिळवुन विजयी घोषित करण्यात आले. सांस्कृतीक मंत्री साठी भार्गवी भालेराव, याशिका परदेशी, महेक राजोरा, मोहिनी विश्वकर्मा, दिशा कडोसे या विद्यार्थ्यांनी उमेदवारी केली होती त्यापैकी महेक राजोरा या उमेदवाराला १७५ मते मिळवुन विजयी घोषित करण्यात आले. क्रीडा मंत्री साठी मुकेश आर्या, समिक्षा पगारे या विद्यार्थ्यांनी उमेदवारी केली होती त्यापैकी मुकेश आर्या या उमेदवाराला २९५ मते मिळवुन विजयी घोषित करण्यात आले. आरोग्य मंत्री साठी सिद्दी पासवान, झेबा शेख, श्रेया मकवान या विद्यार्थ्यांनी उमेदवारी केली होती त्यापैकी झेबा शेख या उमेदवाराला २२९ मते मिळवुन विजयी घोषित करण्यात आले. पर्यावरण मंत्री साठी मोहिनी जगताप, पुजा थापा, शिफा शेख, आफरिन खान, विराज हिरे, या विद्यार्थ्यांनी उमेदवारी केली होती त्यापैकी पुजा थापा या उमेदवाराला १६७ मते मिळवुन विजयी घोषित करण्यात आले.कौशल्य विकास मंत्री साठी झोया खान, वैष्णवी चावला या विद्यार्थ्यांनी उमेदवारी केली होती त्यापैकी वैष्णवी चावला या उमेदवाराला २६३ मते मिळवुन विजयी घोषित करण्यात आले. सार्वजनिक कार्यक्रम मंत्री साठी प्रिती लाकडा, विद्या लहरे, मोहम्मद झिशान तंबोली, नक्षत्र गांगुर्डे, अमित कोठारी, अमन खान, अद्विता सादरे, अमित कोठारी, या विद्यार्थ्यांनी उमेदवारी केली होती त्यापैकी अमित कोठारी या उमेदवाराला १६५ मते मिळवुन विजयी घोषित करण्यात आले. पालक व जनसंपर्क मंत्री पदासाठी समैरा शेख हिची बिनविरोध निवड करण्यात आली. शिक्षण मंत्री पदासाठी रिचा कनोजिया हिची बिनविरोध निवड करण्यात आली. विजयी उमेदवारांचा सत्कार शाळेच्या गोमीबाई श्रॉफ सभागृहात संस्थेचे सचिव रतन चावला यांच्या हस्ते करण्यात आला. व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी व्यासपिठावर प्राचार्य, डॉ. बन्सीलाल गाडीलोहार, मुख्याध्यापिका शितल मेहेरोलिया, मुख्याध्यापिका सिमरन चावला, उपशिक्षक सोपान कांगणे, भाग्यश्री हिरे, विजय पाटील उपस्थित होते. मतदान मोजनी अधिकारी म्हणून राम धोंगडे, राजश्री शिंदे, रेवती पुरानिक, पोपट फोकणे यांनी अतिशय पारदर्शक कामगिरी पार पाडली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन गौरव आमेसर यांनी केले तर आभार भाग्यश्री चावला यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी नॉलबर्ट जोसेफ, रुपेश कोरडे, स्नेहलता अहिरराव, बाळकृष्ण घोलप, रोहित सोनार, नाझमिन शेख, सागर घोरपडे, राहुल ससाने, मोतीमेरी पिल्ले, जयश्री पठाडे, सविता मोरे यांसह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांनी अथक परिश्रम घेतले.

# 15 संप्टेंबर 2025 रोजी ,जिल्हा जिल्हा कृषी अध्यक्ष यांच्या दालनात बोंबाबोंब आंदोलन...!

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी -योगेश चौदंते**

अनेक वेळा कळमनुरी तालुक्यात झालेल्या पंतप्रधान राष्ट्रीय सिंचन ठिबक व तुषार घोटाळ्या बाबत तक्रारी देउन सुद्धा सतत जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी,हिंगोली यांच्याकडून सदरील प्रकरणात कारवाई करण्यात टाळाटाळ करीत असून फक्त वेळ काढू पना व दिवस समोर ढकलण्याचे काम सुरू आहे.वंचित बहुजन आघाडीने सतत कृषी कार्यालय यांचा मान राखला आहे व आम्ही दिनांक 02 सप्टेंबर 2025 रोजी होणारे आंदोलन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांच्या आश्वासनानंतर तात्पुरते रद्द करीत आहोत. मागील 01 वर्षांपासून संबंधित तक्रारीबाबत अनेक वेळा आपणास वेळ देऊन सहकार्य केले असूनदेखील आपल्या कार्यालया मार्फत सतत दुर्लक्ष केले जात आहे, ही अतिशय गंभीर बाब आहे.

म्हणून आपणास कळविण्यात येते की, येत्या दिनांक 14 सप्टेंबर 2025 पर्यंत संबंधित प्रकरणात अंतिम कारवाई करावी.अन्यथा दिनांक 15 सप्टेंबर 2025 रोजी दुपारी 12:10 वाजता आपल्या कार्यालयातच, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांच्या दालनात बसून आम्ही व्यापक स्वरूपाचे बोंबाबोंब आंदोलन करण्याचे लेखी निवेदन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांना कळमनुरी वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष राजू कांबळे यांनी दिले आहे.

# समाज गौरव पुरस्काराचे वितरण

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

प्रकाश म्हात्रे सामाजिक, शैक्षणिक विकास मंडळाच्या वतीने पनवेलच्या प्रभाग नऊ मधील दहावी, बारावी तसेच उच्चशिक्षित करिअर केलेल्या तरुण-तरुणींचा समाज गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. वळवली, टेंभोडे, खिडूकपाडा, आसुडगाव येथील 40 उच्चशिक्षित तरुणांना यावेळी या पुरस्काराने माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या हस्ते गौरविण्यात आले. या कार्यक्रमात दहावी व बारावीच्या यशवंत विद्यार्थ्यांचा सत्कार काशिनाथ पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी माजी आमदार बाळाराम पाटील, काशिनाथ पाटील, युवा नेते हेमराज म्हात्रे, माजी नगरसेवक विष्णू जोशी, गोपाळ भगत, प्रज्योती म्हात्रे, बबन भोईर इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

अथक प्रयत्नातून यश मिळवलेल्या या परिसरातील डॉक्टर, इंजिनियर्स, व्यावसायिक डिग्री मिळालेल्या तरुणांनी आपल्या पुढील पिढीसाठी प्रेरणा व प्रोत्साहन देण्याचे काम करून जास्तीत जास्त तरुणांना शिक्षणाकडे आकर्षित करावे आणि त्यांना योग्य मार्गदर्शन करावे अशी अपेक्षा संयोजक प्रकाश म्हात्रे यांनी व्यक्त केली.



यावेळेस सीकेटी विद्यालयाचे उपप्राचार्य डॉक्टर शैलेश वाजेकर, रयतचे प्राचार्य मोहन पाटील, एडवोकेट विजय घाडगे, पोलीस निरीक्षक अंकुश म्हस्कर, मार्केटिंग मॅनेजर सतीश मुंडे, चित्रपट निर्माता मुकेश कांबळे यांच्यासह अनेक तरुणांना समाज गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी माजी आमदार बाळाराम पाटील यांनी प्रकाश म्हात्रे सामाजिक मंडळाला धन्यवाद दिले. आणि अशा प्रकारची चांगले कामे भविष्यात करत राहावी अशी अपेक्षा व्यक्त केली

# भजन स्पर्धा उत्साहात संपन्न भजनी मंडळांचा उत्फुर्ते प्रतिसाद...

**देवळाली कॅम्प (प्रतिनिधी )**

येथील शिवयूवा प्रतिष्ठान सार्वजनिक गणेशोत्सव उत्सव मंडळ यांच्या माध्यमातून गणेशोत्सवा निमित्त तालुका स्तरीय भव्य महिला पुरुष व बाल गट भजन स्पर्धा व गायन स्पर्धा देवळाली विजयनगर येथील तुळजा भवानी माता मंदीर येथे आयोजीत करण्यात आली होती. यावेळी भजनी मंडळासह बाल भजनी मंडळानी देखील उत्फुर्ते प्रतिसाद दिला महाराष्ट्रतील संत परंपरा संतांचा मानवतेचा विचार जनमाणसात रुजावा या उद्देशाने गेल्या वर्षपासुन सातत्याने या भजन स्पर्धेच आयोजन करण्यात येत असते.या मध्ये नाशिक तालुक्यातील मोठ्याप्रणावर भजनी मंडळांनी सहभाग घेतला यासाठी रोख रक्कम आकर्षक पारितोषिके स्पर्धकांना ठेवण्यात आली. यावेळी भैरवनाथ प्रसादिक बाल भजनी मंडळ,श्री संत ज्ञानेश्वर बाल भजनी मंडळ चिंचोली, श्री गजानन महाराज भजनी मंडळ, श्री संत तुकाराम भजनी मंडळ, तुळजा भवानी महिला भजधी मंडळ,गुरूमाऊली महिला भजनी मंडळ सह अनेक नामवंत भजनी मंडळांनी सहभाग नोंदवला होता.यात भजनी मंडळांनी अभंगा बरोबरच गवळणी सादर केल्या यावेळी सुत्रसंचालन प्रा ललित भदे सर यांनी व स्पर्धेचे व्यवस्थापन शिवयुवा प्रतिष्ठान अध्यक्ष प्रमोद मोजाड,




ह.भ.प.ज्ञानेश्वर निसाळ विनोद डांगे, हेमंत गायकवाड, सतिश थोरात ,गणपत शेलार, आकाश बोराडे, सतिश थोरात यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी यांनी केले स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी प्रा.ललित भदे सर,संदीप शेटे सर यांनी परिश्रम घेतले. परिक्षक म्हणून प्रमोद खापरे सर, खंडेराव जुंद्रे बाबा,संदीप शेटे सर आदींनी काम बघितले

# कक्कय्या समाज सार्वजनिक गणेशोत्सवाच्या वतीने

## खेळ पैठणींचा कार्यक्रम संप्पन्न!



**दैनिक युवक आधार**
**मुबंई :(दत्ता खंदारे )**

कक्कय्या समाज सार्वजनिक गणेशोत्सव धारावी आयोजित व महाराष्ट्र बाजारपेठ यांच्या सहकार्याने सोमवार दि.१सप्टेंबर २०२५ रोजी श्री गणेश विद्या मंदिर हायस्कूल येथे मान बहिणींचा खेळ पैठणींचा हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमांमध्ये प्रथम पारितोषिक सोन्याचे नथ सौ राजश्री शिखरे व द्वितीय पारितोषिक आकर्षक पैठणी सौ माधुरी मंगेश गायकवाड व तृतीय पारितोषिक चांदीची फेम सौ अश्विनी पडयाळ यांना देण्यात आली. तसेच महिलांसाठी लकी ड्रॉ ठेवण्यात आले होते यामध्ये दहा हजार रुपयाचे गिफ्ट व्हाउचर आकर्षक बक्षीस म्हणून ठेवण्यात आले होते. ते बक्षीस श्रीमती सुभद्रा खंदारे यांना मिळाले.कार्यकम बघण्यासाठी व त्यात सहभागी होऊन खेळण्यासाठी महिलांनी उस्फुर्त अशी गर्दी केली होती. संपूर्ण नियोजित जागा महिलांनी भरून गेली असल्याचे या वेळी पाहायला मिळाले.

या कार्यक्रमास कक्कय्या समाज सार्वजनिक गणेशोत्सव चे अध्यक्ष माननीय श्री हेमंत लखमाजी व्हटकर,सचिव माननीय श्री मसाजी श्रीपती होटकर, खजिनदार श्री विजय बाबुराव शिंदे,उपाध्यक्ष किरण भारत व्हटकर व उपाध्यक्ष श्री गिरीराज शेरखाने तसेच मार्गदर्शक श्री विजय धर्मा पोळ,श्री गौतम व्हटकर व बाळकृष्ण शिंदे हे उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री संतोष लिंबोरे यांनी केले तर कार्यक्रमाची सांगता सचिव श्री मसाजी श्रीपती होटकर यांनी केली.

कक्कया समाज सार्वजनिक गणेशोत्सव तर्फे श्री संतोष लिंबोरे यांचा सत्कार सचिव श्री मसाजी श्रीपती होटकर यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.डॉक्टर कौतिक दांडगे (संस्थापक अध्यक्ष महाराष्ट्र बाजारपेठ ) यांचे विशेष सहकार्य लाभले.

# झुलेलाल इंस्टीट्यूट ऑफ टेक्नालॉजी संस्थेस

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट

**राकेश यादव प्रतिनिधी**
**दैनिक युवक आधार वाडी नागपूर**
**श्री गणेश उत्सवानिमित्त आरती***

**नागपूर, दि.२ :-** गोधनी येथील झुलेलाल इंस्टीट्यूट ऑफ टेक्नालॉजी या संस्थेतर्फे श्री गणेश उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज या संस्थेस भेट देवून श्री गणेशाचे पूजन करुन आरतीत सहभाग घेतला.

यावेळी आमदार परिणय फुके, अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान, संस्थेचे अध्यक्ष महेश साधवानी, विरेंद्र कुकरेजा, नॅशनल कॅन्सर इंस्टिट्यूटचे प्रमुख शैलेश जोगळेकर, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, तसेच घनशामजी कुकरेला, जयप्रकाश गुप्ता, गिरीष साधवानी, असरानी, संस्थेचे प्राचार्य डॉ. विवेक नानोटी, उपाध्यक्ष एस.ई. चौधरी आदी लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री गणेश उत्सवानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला. संस्थेचे प्रमुख महेश साधवानी यांनी स्वागत करुन संस्थेच्या उपक्रमाबद्दल माहिती दिल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज जिल्हाधिकारी यांच्या 'राजयोग' या निवासस्थानी गणेशोत्सवानिमित्त भेट दिली. तसेच श्री गणेशाचे पूजन करुन आरती केली.

जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, डॉ. श्रीमती शालिनी आशरी इटनकर यांनी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांना पुष्पगुच्छ देवून यावेळी स्वागत केले. यावेळी कुमारी आरना इटनकर हिने श्री गणेशाच्या आरतीमध्ये सहभाग घेतला.

# राळेगाव उपविभागामार्फत भटके व विमुक्त दिवस उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी -जितेंद्र खोडे**

राळेगावः-दि.०२/०९/२०२५ रोजी राळेगाव उपविभागात भटके व विमुक्त समाजाच्या सक्षमीकरणासाठी आयोजित भटके व विमुक्त दिवस मोठ्या उत्साहात आणि सामाजिक एकतेच्या वातावरणात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमात विविध समाज घटक,संघटना आणि प्रशासनातील अधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.कार्यक्रमाच्या अध्यक्षीय स्थानी मा.श्री सुधीर पाटील,उपविभागीय अधिकारी राळेगाव हे विराजमान होते तर प्रमुख उपस्थित म्हणून मा.श्री.अमित भोईटे तहसीलदार राळेगाव,श्रीम.ईसाळ सहा. गटविकास अधिकारी राळेगाव, मार्गदर्शक श्री.अभिजित घोडे, निरीक्षक इतर मागास व बहुजन कल्याण विभाग यवतमाळ,सौ.छाया पिंपरे,राळेगाव यांची उपस्थिती लाभली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. महादेव सानप मंडळ अधिकारी यांनी केले,तर प्रास्ताविक श्री.अरुण भगत साहेब नायब तहसीलदार यांनी केले.समाजात प्रेरणादायी कार्य करणाऱ्या डॉ.राहुल सोनाळे,अरुण राजू घुले,बंटी राजू घुले,विशाल बाळाभाऊ शिंदे आणि हनुमान जगदेव माने यांचा विशेष सत्कार करण्यात आला.श्री.सखाराम कचरे,श्री.नामदेव घुले,डॉ.भीमराव कोकरे,श्री.सागर एंबडवार आणि श्री.राहुल चव्हाण यांनी समाजाच्या व्यथा,विकासाची दिशा आणि शासनाच्या भूमिका यावर मोलाचे विचार मांडले.भटके विमुक्त विकास परिषद,अहिल्याबाई होळकर धनगर समाज संघटना,मी वडार महाराष्ट्राचा, भटके विमुक्त कल्याणकारी परिषद, सरोदी समाज संघटना,राष्ट्रीय भोई समाज क्रांती दल आणि इतर मान्यवर संघटनांनी कार्यक्रमात सक्रीय




सहभाग नोंदवला.सर्व मान्यवरांचे मार्गदर्शन,संघटनांचा सहभाग आणि समाजबांधवांची उपस्थिती यामुळे हा कार्यक्रम सामाजिक जागृतीचा एक प्रभावी मंच ठरला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व संयोजकांचे आणि सहभागींचे श्री. विक्रांत खरतडे,नायब नाझर तहसील कार्यालय राळेगाव यांनी मनःपूर्वक आभार मानले.या कार्यक्रमातून मिळालेली ऊर्जा आणि प्रेरणा घेऊन समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्रितपणे काम करण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.

# झुलेलाल इंस्टीट्यूट ऑफ टेक्नालॉजी संस्थेस

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट

**राकेश यादव प्रतिनिधी**
**दैनिक युवक आधार वाडी नागपूर**
**श्री गणेश उत्सवानिमित्त आरती***

**नागपूर, दि.२ :-** गोधनी येथील झुलेलाल इंस्टीट्यूट ऑफ टेक्नालॉजी या संस्थेतर्फे श्री गणेश उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज या संस्थेस भेट देवून श्री गणेशाचे पूजन करुन आरतीत सहभाग घेतला.



यावेळी आमदार परिणय फुके, अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान, संस्थेचे अध्यक्ष महेश साधवानी, विरेंद्र कुकरेजा, नॅशनल कॅन्सर इंस्टिट्यूटचे प्रमुख शैलेश जोगळेकर, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, तसेच घनशामजी कुकरेला, जयप्रकाश गुप्ता, गिरीष साधवानी, असरानी, संस्थेचे प्राचार्य डॉ. विवेक नानोटी, उपाध्यक्ष एस.ई. चौधरी आदी लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री गणेश उत्सवानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला. संस्थेचे प्रमुख महेश साधवानी यांनी स्वागत करुन संस्थेच्या उपक्रमाबद्दल माहिती दिल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज जिल्हाधिकारी यांच्या 'राजयोग' या निवासस्थानी गणेशोत्सवानिमित्त भेट दिली. तसेच श्री गणेशाचे पूजन करुन आरती केली.

जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, डॉ. श्रीमती शालिनी आशरी इटनकर यांनी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांना पुष्पगुच्छ देवून यावेळी स्वागत केले. यावेळी कुमारी आरना इटनकर हिने श्री गणेशाच्या आरतीमध्ये सहभाग घेतला.

# जोगेश्वरीत साईनाथ कृपा मंडळाची समाजसेवेची अखंड परंपरा – ३५ वर्षांचा यशस्वी प्रवास

**दैनिक युवक आधार**
**किशोर गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**

मुंबई साई सिद्धी नगर, साई स्वामी कंपाऊंड, गुंफा रोड, मुंबई-६० येथे कार्यरत असलेल्या साईनाथ कृपा मंडळाने यंदा आपल्या ३५ व्या वर्षात यशस्वी प्रवेश केला आहे. सन १९९० मध्ये स्थापन झालेले हे मंडळ आज धार्मिक श्रद्धा, सामाजिक कार्य आणि सांस्कृतिक एकतेचे प्रतीक बनले आहे.

३५ वर्षांच्या या प्रवासात मंडळाने गणेशोत्सव, साई पूजन, विविध धार्मिक विधींसोबतच वैद्यकीय शिबिरे, अन्नदान, गरजू विद्यार्थ्यांना मदत, वृक्षारोपण, तसेच परिसरातील विकास कामे यासारखे अनेक सामाजिक उपक्रम यशस्वीरित्या राबवले आहेत. यामुळे मंडळाने परिसरातील नागरिकांच्या मनात वेगळी ओळख निर्माण केली आहे.

मंडळाचे पदाधिकारी – अध्यक्ष श्री. महेश चव्हाण, सेक्रेटरी श्री. प्रदीप परमार, खजिनदार श्री. शैलेश चिटणीस तसेच सल्लागार श्री. उमेश नार्वेकर व श्री. केतन वेदक तसेच सर्व कार्यकारिणी सदस्य यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाची संघटनशक्ती अधिक बळकट झाली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली तरुण पिढी समाजकार्याशी जोडली जात आहे.

साईनाथ कृपा मंडळाने केवळ धार्मिक कार्यक्रमांपुरतेच कार्य न करता 'समाजहितासाठी मंडळ' ही संकल्पना रुजवली आहे. भविष्यात आरोग्य उपक्रम, युवकांसाठी करिअर मार्गदर्शन शिबिरे, तसेच पर्यावरण संवर्धनाचे उपक्रम राबविण्याची मंडळाची योजना आहे.

३५ वर्षांचा हा प्रवास म्हणजे श्रद्धा, सेवा आणि समर्पणाचा एक आदर्श आहे. परिसरातील नागरिकांनी मंडळाच्या कार्याचे कौतुक करत भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



